दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २१० I गुरूवार १४ मे २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## आत्म्याचा शोध



'सहजयोग'

भाग ५१

अनेक लोक भाषणे देतात की, आपल्यात आत्मा आहे, आत्म्याचा शोध घ्या, त्याला शोधले पाहिजे. त्यासाठी मग कुणी सांगते की डोक्यावर उभे राहा (शीर्षासन करा), कुणी सांगते इतकी पूजा करा, इतकी श्रद्धा ठेवा, तुमची जेवढी श्रद्धा असेल तेवढे पैसे अर्पण करा आणि या लोकांचा डामडौल वाढवा; अशा गोष्टींनी आत्मा कधीही मिळू शकत नाही. उलट, यामुळे तो कायमचा हरवून जाईल. अशा प्रकारे आत्म्याचा शोध घेता येत नाही.आत्मा हा स्वतः प्रकाशमान असतो. जे लोक संसाराच्या बाहेर किंवा जंगलात राहून संन्यास घेतात आणि द्राविडी प्राणायाम करून आत्म्याचा शोध घेतात, ते अतिशय चुकीच्या मार्गावर आहेत. आत्मा आपल्याच आत प्रकाशित होतो 'सहज सहज समाधी लागे'. आजवर जे थोर विचारवंत आणि ज्यांना आपण 'गुरू' म्हणतो, त्यांनी सांगितलेली एक अन् एक गोष्ट सत्य आहे; आणि ती गोष्ट सिद्ध करण्याची वेळ आता आली आहे. ही ती वेळ आहे जेव्हा आपण त्यांची शिकवण सिद्ध करून पाहू शकतो की खरोखरच आपल्या आत आत्मा नावाची काही गोष्ट आहे की नाही.

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे मुंबईत अनावरण

मुंबई : नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. याप्रसंगी या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. तसेच कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या १३ प्रमुख आखाड्यांच्या साधू-महंतांशी संवाद साधून झालेल्या तयारीचा आढावा घेतला.

या कुंभमेळ्यासाठी एकूण ३७७ एकर जमीन आरक्षित करण्यात आली असून त्यातील ९४ एकर जमीन नाशिक महापालिकेने संपादित केली आहे. उर्वरित २८३ एकर जमिनीच्या संपादनासाठी सरकारने २२६७ कोटी रुपयांच्या भरघोस निधीला आज मंजुरी दिली आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री गिरीश महाजन, मंत्री छगन भुजबळ, मंत्री दादाजी भुसे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि १३ आखाड्यांचे साधू महंत उपस्थित होते. १४५० एकरवर भव्य साधुग्रामची निर्मिती केली जाणार असून १५ हजार स्वच्छता मित्रांच्या माध्यमातून परिसर स्वच्छ ठेवला जाईल. कुंभमेळ्याच्या निधीत कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही असे याप्रसंगी जाहीर केले.

# इंधन बचतीसाठी महाराष्ट्र सरसावला

## उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्र्यांकडून निर्बंध जाहीर

- मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्या अर्ध्यावर
- विदेश दौरे, हेलिकॉप्टर वापरावर निर्बंध
- प्रवासी वाहतुकीचा अवलंब करण्याचे आवाहन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता भारतातही जाणवू लागला असून, इंधन आणि परकीय चलन बचतीसाठी केंद्र व राज्य सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर जपून करण्याचे आवाहन केल्यानंतर महाराष्ट्र सरकारनेही तातडीने पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतलेल्या दोन उच्चस्तरीय बैठकीत इंधन बचतीसाठी सहा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केले. मंत्री व अधिकाऱ्यांच्या दौऱ्यावर नियंत्रण आणताना नागरिकांनीही मेट्रो आणि सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार, मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तात्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात आली आहे. बाहेरगावी दौऱ्यादरम्यान निर्धारित संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात असणार नाहीत, याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांवर सोपवण्यात आली आहे. दरम्यान, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताफ्यातही केवळ दोन गाड्या दिसून आल्याने या निर्णयाची देशभर चर्चा सुरू झाली. त्यानंतर महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यात केवळ आठ गाड्या दिसून आल्या. अनेक मंत्री आता इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करत असल्याचेही पाहायला मिळत आहे.

मुख्यमंत्र्यांनी मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विदेश दौरे टाळण्याचे निर्देश दिले असून, अत्यावश्यक नसल्यास शासकीय विमान आणि हेलिकॉप्टरचा वापर न करण्याचे आदेश दिले आहेत. त्याऐवजी नियमित विमानसेवा आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

सरकारी बैठका शक्यतो व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज आणि डेकोरेटिव्ह लाईटिंगवर नियंत्रण आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, पुण्यात 'व्हीआयपी कल्चर'लाही मोठा ब्रेक लागणार असून, महत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी यासंदर्भात प्रशासनाला निर्देश दिले असून, निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ सुरू झाली आहे.



### मुख्यमंत्र्यांचे ६ मोठे निर्णय

- मुख्यमंत्री व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर
- मंत्री-अधिकाऱ्यांचे विदेश दौरे टाळण्याचे आदेश
- शासकीय विमान व हेलिकॉप्टर वापरावर निर्बंध
- मेट्रो व सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्याचे निर्देश
- बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यावर भर
- अनावश्यक होर्डिंग्ज व डेकोरेटिव्ह लाईटिंगवर नियंत्रण

# निट पेपरफुटीचे कनेक्शन अहिल्यानगर जिल्ह्यात....

## राहुरी तालुक्यातील डॉक्टरला सीबीआयने केली अटक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला वेग आला असून, केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. सदरील प्रकरणाचे धागेदोरे थेट राहुरी तालुक्यात पोहोचल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात सीबीआय ने दुसरा आरोपी म्हणून राहुरी तालुक्यातील एका तरुण डॉक्टरला अटक केली आहे. डॉ. धनंजय निवृत्ती लोखंडे (वय २६) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव असून, तो राहुरी तालुक्यातील माहेगाव-महाडूक सेंटर परिसरातील रहिवासी आहे.



समजलेल्या माहितीनुसार, धनंजय लोखंडे याने कर्नाटक राज्यातील मंगळूर येथे बीएएमएस शिक्षण पूर्ण केले आहे. तो मागील चार ते पाच वर्षांपासून पुण्यातील वाघोली येथे वास्तव्यास होता. तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया व कन्सल्टिंगचे काम करत असल्याची माहिती समोर आली आहे.धनंजयचे वडील शाळेत क्लार्क म्हणून कार्यरत असून त्याला दोन भाऊ आहेत. तो गावाकडे कधीतरीच येत असल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, काल सीबीआय चे एक पथक चौकशीसाठी राहुरी (पान ४ वर)

# पुण्यात हॉस्पिटलसमोर सापडला जिवंत बॉम्ब

## क्षणार्धात परिसर सील, सात तासांचा टाइमर सेट

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** हडपसर परिसरात कामधेनु इस्टेटमधील एका प्रतिष्ठित सुपर स्पेशालिस्ट खासगी हॉस्पिटलच्या टॉयलेटमध्ये एक जीवंत बॉम्ब आढळल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती मिळताच बॉम्ब शोधक आणि नाशक पथक (बीडीएस) तातडीने घटनास्थळी दाखल झाले.



टॉयलेटमध्ये सापडलेल्या या बॉम्बमध्ये सात तासांचा टायमर सेट केलेला होता. बीडीएस पथकाने अत्यंत सावधगिरीने तब्बल सात तासांच्या अथक प्रयत्नानंतर या बॉम्बची तपासणी पूर्ण केली आणि त्यास सुरक्षित ठिकाणी हलवले. ही घटना हॉस्पिटलच्या आत घडल्याने रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचारी यांच्यात प्रचंड गोंधळ उडाला होता. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील हालचाली तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आल्या.

या जीवंत बॉम्बची घटना कोणी आणि का घडवली, याबाबत परिसरात विविध चर्चांना (पान ४ वर)

## होमगार्डचे माजी समादेशक डॉ. राज शेख यांना अटक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** बेकायदेशीर गर्भपात करण्यासाठी लागणाऱ्या गोळ्या पुरविण्याचे काम करणाऱ्या श्रीरामपुरातील वॉर्ड न. २ मधील डॉ. राज अजीज शेख यांना काल पहाटे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पथकाने अटक केली.



गर्भलिंग चाचणी व बेकायदेशीर गर्भपात प्रकरण

डॉ. राज शेख यांना अटक केल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी बेकायदेशीर गर्भपाताच्या गोळ्या पुरवल्याचे कबूल केले आहे. डॉ. शेख यांना काल न्यायालयात हजर केले असता राहाता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

लोणी पोलीस स्टेशन येथे दाखल असणाऱ्या गर्भलिंग चाचणी व बेकायदेशीरपणे गर्भपात प्रकरणाबाबतच्या गुन्ह्यात यापूर्वी एकूण १२ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये एकूण दोन डॉक्टर,चार एजंट, व सहा संबंधित गर्भवती महिलांचे कुटुंबीय असे एकूण १२ आरोपी अटक आहेत. आजखेरपर्यंत या गुन्ह्यात एकूण १३ आरोपी अटक आहेत. गुन्ह्याचा बारकाईने तपास सुरु आहे. गर्भलिंग निदान केलेल्या महिलांची माहिती घेऊन पुढील तपास करण्यात येत आहे .

तसेच गर्भलिंग निदाणासाठी बेकायदेशीर पणे मशीन कोठून खरेदी केले, त्यासाठी एजंट कोण त्याचीही माहिती प्राप्त झाली असून त्यांनाही ताब्यात घेणेकामी पथक रवाना केले आहे. डॉ. राज शेख हे श्रीरामपूर तालुक्यात त्यांनी गृहरक्षक दलात अनेक वर्ष काम केले असून श्रीरामपूर तालुका गृहरक्षक दलाचे निवृत्त समादेश म्हणून होते.

# पोलिस बंदोबस्तातच गोळीबार...तरीही गुन्हा नाही!

### नेवासा तालुक्यातील पिंपरी शहाली येथील बैलगाडा शर्यतीत दहशतीचा आरोप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात कायदा-सुव्यवस्थेचा धाक उरला आहे की नाही, असा सवाल उपस्थित करणारी धक्कादायक घटना पिंपरी शहाली येथे घडल्याचा आरोप समोर आला आहे. शहावली बाबा यात्रा उत्सवानिमित्त आयोजित बैलगाडा शर्यतीत कथितरित्या गावठी पिस्तूल, लाठ्याकाठ्या घेऊन काही जणांनी दहशत माजवत गोळीबार केल्याची माहिती समोर येत असताना, विशेष म्हणजे या प्रकरणी अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १० मे रोजी बैलगाडा शर्यतीच्या अंतिम सामन्यादरम्यान दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. काही जण हातात कथित गावठी पिस्तूल घेऊन बैलगाड्यांजवळ पोहोचले आणि शर्यत खेळू नका, अन्यथा परिणाम वाईट होतील, अशा धमक्या दिल्याचा आरोप आहे. त्यानंतर कथित गोळीबार झाल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने संबंधित व्यक्ती बचावली.



घटनेनंतर मोठा गोंधळ उडाला. गर्दीने विरोध केल्यानंतर संबंधित काही जण घटनास्थळावरून पळून जात असताना त्यापैकी एका व्यक्तीच्या स्वतःच्याच पायाला गोळी लागली. या संपूर्ण प्रकाराचे मोबाईल चित्रीकरण झाल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. ज्याच्या पायाला स्वतःच्याच हातून बंदुकीची गोळी लागली त्याचे नाव सुयश असल्याचे (पान ४ वर)

# मित्रांना वाचवण्यासाठी जामखेडकरांना वेठीस धरले

## सभापती राम शिंदेंवर रोहित पवारांचा हल्लाबोल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले असून, काही अतिक्रमणधारक सभापती प्रा. राम शिंदे यांचे निकटवर्तीय असल्याने त्यांना वाचवण्यासाठी जामखेडकरांना वेठीस धरले जात आहे, असा घणाघाती आरोप आमदार रोहित पवार यांनी केला. शहरातील विविध विकासकामांची पाहणी केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आमदार पवार यांनी बसस्थानक, ग्रामीण रुग्णालय तसेच अन्य विकासकामांची पाहणी केली. यावेळी ज्येष्ठ नेते राजेंद्र कोठारी, अमोल राळेभात, नगरसेवक वसीम सय्यद, रमेश आजबे, विजयसिंह गोलेकर, अॅड. अरुण जाधव, सागर कोल्हे, राजेश गोरे, इस्माईल सय्यद, गणेश उगले, युवराज उगले, विश्वनाथ राऊत, अॅड. मयुर डोके यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, मुंबई, इंदोर येथील अतिक्रमणे हटवण्यासाठी पुढाकार घेतला जातो, मात्र जामखेडमधील अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. अधिकाऱ्यांना माझ्या आदेशाशिवाय कोणतेही काम सुरू करू नका, असे सांगितले जाते. सभापतींनी आपल्या पदाचा वापर जनतेच्या विकासासाठी करावा, मित्रांच्या फायद्यासाठी नव्हे.



समृद्धी महामार्ग व प्रस्तावित शक्तीपीठ मार्गावरील जमीन व्यवहारांवरही त्यांनी गंभीर आरोप केले. समृद्धी महामार्ग जाहीर होण्यापूर्वीच काही अधिकारी, नेते व त्यांच्या निकटवर्तीयांनी शेतकऱ्यांकडून कमी दरात जमिनी खरेदी केल्या. नंतर रस्त्याचा मार्ग निश्चित झाल्यानंतर त्या जमिनी मोठ्या किमतीत विकल्या गेल्या. यात शेतकऱ्यांऐवजी दलालांनाच कोट्यवधींचा फायदा झाला, असा दावा त्यांनी केला.

प्रस्तावित शक्तीपीठ मार्गाबाबतही असाच प्रकार सुरू असल्याचे सांगत, काही लोकांनी मार्गालगत जमीन खरेदी केल्याचा आरोप पवार यांनी केला. रस्ता नेमका कुठून जाणार, याची माहिती काही मोजक्यांनाच आधी कशी मिळते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

NEET परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणावरही त्यांनी सरकारवर निशाणा साधला. सामान्य कुटुंबातील विद्यार्थी वर्षभर मेहनत करून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहतात. महागडे क्लासेस लावून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी पेपरफुटीमुळे खेळ होत असल्याचे त्यांनी सांगितले. पेपर रद्द झाला, पण दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.पेट्रोल-डिझेल दरवाढीवर टीका करताना पवार म्हणाले, पंतप्रधान अनावश्यक गाड्या फिरवू नका, असे सांगतात; मात्र भाजपाचे नेते वीस-वीस गाड्यांच्या (पान ४ वर)

# मान्सूनपूर्व पावसाच्या जोरदार हजेरीमुळे शेतकऱ्यांची दाणादाण

## दीड तास चाललेल्या तुफान पावसामुळे परिसर जलमय

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी आणि शिर्डी विधानसभा मतदारसंघातील पंचक्रोशीला बुधवारी (दि. १३) सायंकाळी अवकाळी पावसाने अक्षरशः थैमान घातले. मान्सूनपूर्व पावसाच्या या जोरदार हजेरीमुळे शेतकऱ्यांची मोठी दाणादाण उडाली असून, वादळी वाऱ्यामुळे झाडे कोसळून वाहतूक ठप्प झाली. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि ढगांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. सुमारे दिड तास चाललेल्या या तुफान पावसाने संपूर्ण परिसराला जलमय केले आणि जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले.

पावसासोबतच वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, आश्वी-दाढ रस्त्यावरील विश्रामगृहाजवळ एक भलेमोठे लिंबाचे झाड उन्मळून रस्त्यावर पडले. यामुळे या मार्गावरील वाहतूक बराच वेळ पूर्णपणे ठप्प झाली होती. त्याचबरोबर आश्वी बुद्रुक येथील चावडी जवळील जुन्या लिंबाची मोठी फाटी तुटून थेट मोटर सायकलवर कोसळल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. आश्वी खुर्द, उंबरी बाळापूर, शेडगाव, पिंप्री-लौकी अजमपूर, दाढ खुर्द, निमगावजाळी, पानोडी, मांची आदि ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे उन्मळून पडली आहेत. आश्वी खुर्द येथे विजेचे खांब तुटले असून डीपी देखील कोसळल्याची माहिती मिळाली आहे. परिसरातील ग्रामपंचायत आणि खाजगी घरावरील सोलर पॅनलचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर आश्वी बुद्रुक येथील स्टेट बॅक ऑफ इंडिया टॉवर कोसळला. आश्विन मुथ्था यांच्या घरासमोरील झाड तसेच ज्ञानदेव ताजणे यांच्या वस्तीवरील तीनशे वर्ष जुने वडाचे कोसळले. तसेच अनिस शेख यांच्या घरावर आणि घराशेजारील उभ्या असलेल्या गाडीवर शंभर वर्ष जुने कोसळल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्याचबरोबर मांची रस्त्यावरील बाबासाहेब बाबासाहेब किसन गायकवाड यांच्या घराचे पत्रे उडाले. सुरेश होडगर यांच्या घरासह गोठ्यावर देखील झाड उन्मळून पडल्याने मोठे नुकसान झाले. ज्ञानेश्वर वाकचौरे यांच्या वीटभट्टीचे देखील मोठे नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसाचा फटका काढणीला आलेला आणि शेतात साठवून ठेवलेला कांदा पिकांला बसला आहे. त्याचप्रमाणे वादळी वाऱ्यामुळे आंबा, जांभूळ आणि डाळिंबाच्या फळ बागांचे नुकसान होऊन मोठ्या प्रमाणावर फळगळती झाली आहे. शेतीसोबतच परिसरातील वीटभट्ट्यांचे काम सुरू असल्याने कच्च्या विटांचेही नुकसान झाले आहे. आश्वी परिसरातील अनेक दुकानांबाहेर ठेवलेले सामान भिजल्याने आणि काही वस्तूंची पडझड झाल्याने व्यापारी वर्गालाही मोठा आर्थिक फटका बसला आहे. पाऊस सुरू होताच वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना प्रचंड उकाडा आणि अंधार अशा दुहेरी मनस्तापाचा सामना करावा लागला आहे



## संपादकीय...




## धर्माच्या ध्रुवावर उभे राहिलेले राजकारण...

भारतीय लोकशाहीची खरी ताकद ही तिच्या विविधतेत, सर्वधर्मसमभावात आणि सहिष्णुतेत आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशा विविध धर्मांचे लोक एकत्र नांदणारा भारत जगासाठी आदर्श मानला जातो. मात्र गेल्या काही वर्षांत देशाच्या राजकारणाची दिशा पाहिली, तर धार्मिक ध्रुवीकरण हेच निवडणुकांचे प्रमुख सूत्र बनत चालल्याचे स्पष्ट दिसते. विकास, रोजगार, शिक्षण, आरोग्य यांसारखे मूलभूत प्रश्न मागे पडत आहेत आणि मतदारांची विभागणी धर्माच्या आधारावर केली जात आहे. पश्चिम बंगाल, आसाम आणि केरळच्या निवडणुकीतील आकडेवारी हेच वास्तव अधोरेखित करते.

भाजपने पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये एकही मुस्लिम उमेदवार न देता मोठे यश मिळवले. दुसरीकडे विरोधी पक्षांमधील बहुतांश मुस्लिम आमदार हे काँग्रेस, तृणमूल किंवा इतर तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्षांकडून निवडून आले. त्यामुळे एक नवा राजकीय संदेश स्पष्ट झाला आहेभाजप आता मुस्लिम मतांवर अवलंबून राहिलेली नाही. उलट हिंदू मतांचे व्यापक एकत्रीकरण हीच त्यांची निवडणूक रणनीती बनली आहे. एक हिंदू विरुद्ध बाकी सर्व असे वातावरण निर्माण करण्यात भाजप यशस्वी होत असल्याचे चित्र दिसते.

हे वास्तव केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नाही. संसदेतील मुस्लिम प्रतिनिधित्व सातत्याने घटत आहे. देशात मुस्लिम लोकसंख्या १५ टक्क्यांहून अधिक असताना लोकसभेत त्यांचे प्रतिनिधित्व अवघे चार-पाच टक्क्यांवर आले आहे. अनेक राज्यांमध्ये एकही मुस्लिम मुख्यमंत्री नाही. न्यायव्यवस्था, प्रशासकीय उच्चपदे आणि राजकीय निर्णयप्रक्रियेतही त्यांची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे मुस्लिम समाज राजकीयदृष्ट्या सत्तेपासून दूर फेकला जात असल्याची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे.

मात्र यामध्ये दुसरी बाजूही महत्त्वाची आहे. शिक्षण, वैद्यकीय क्षेत्र, सॉफ्टवेअर, बँकिंग, उद्योग, माध्यमे आणि नागरी सेवांमध्ये मुस्लिम समाजाचे प्रमाण वाढत आहे. म्हणजेच समस्या सामाजिक किंवा आर्थिक क्षेत्रातील नसून मुख्यतः राजकीय प्रतिनिधित्वातील आहे. हे चित्र भारतातील लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. कारण कोणत्याही समाजाला राजकीय प्रक्रियेपासून दूर ठेवले गेले, तर त्यातून असंतोष वाढण्याचा धोका असतो.

आजची सर्वात मोठी समस्या म्हणजे धर्मनिरपेक्ष पक्षांची गोंधळलेली भूमिका. मुस्लिम मतांवर अवलंबून असतानाही ते उघडपणे मुस्लिमांच्या प्रश्नांवर बोलण्यास घाबरतात. शाहीनबाग आंदोलन असो किंवा धार्मिक हिंसाचाराचे प्रसंगअनेक पक्षांनी स्पष्ट भूमिका घेण्याचे टाळले. कारण हिंदू मतदार नाराज होतील, ही भीती त्यामागे आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्षतेची संकल्पना केवळ घोषणांपुरती मर्यादित राहत आहे. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाकडे या नव्या राजकीय वास्तवाला उत्तर देणारी ठोस रणनीती दिसत नाही.

दुसरीकडे भाजपने हिंदू अस्मिता, राष्ट्रवाद आणि सुरक्षेच्या मुद्द्यांभोवती व्यापक सामाजिक एकीकरण घडवून आणले आहे. जातींच्या पलीकडे जाऊन हिंदू मतांचे ध्रुवीकरण करण्यात त्यांना यश आले. हिंदी पट्ट्यातील पारंपरिक जातीय समीकरणे मोडून काढत त्यांनी बहुसंख्याकांचे राजकारण उभे केले. याच रणनीतीचा प्रभाव आता बंगाल, आसाम आणि दक्षिणेकडील काही राज्यांतही दिसू लागला आहे.

या परिस्थितीत एमआयएमचे असदुद्दीन ओवैसी मुस्लिमांना स्वतंत्र राजकीय नेतृत्वाचा पर्याय सुचवतात. पण भारताचे वास्तव पाकिस्तानसारखे नाही. येथे स्वतंत्र मुस्लिम राजकारण अधिक ध्रुवीकरण घडवून आणू शकते आणि त्याचा फायदा भाजपलाच होण्याची शक्यता आहे. भारतीय मुस्लिमांनी ऐतिहासिकदृष्ट्या नेहरू-गांधी कुटुंब, समाजवादी नेते, डावे पक्ष किंवा ममता बॅनर्जी यांसारख्या हिंदू नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे. त्यामुळे स्वतंत्र धार्मिक राजकारण हा दीर्घकालीन उपाय ठरणार नाही.

भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेची निवड केली आहे. ही संकल्पना फक्त अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी नाही, तर बहुसंख्याकांच्या नैतिक जबाबदारीसाठीही आहे. भारतात जितकी लोकसंख्या तितका हक्क अशी प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व व्यवस्था नाही; पण म्हणून सामाजिक संतुलन पूर्णपणे बिघडणेही लोकशाहीसाठी घातक आहे. लोकशाही फक्त बहुमताचे राज्य नसते, तर सर्व समाजघटकांचा विश्वास टिकवण्याची प्रक्रिया असते.

आज गरज आहे ती नव्या सामाजिक संवादाची. हिंदू-मुस्लिम या दोन टोकांवर समाजाला उभे करण्याऐवजी विकास, रोजगार, शिक्षण, शेती, महागाई आणि आरोग्य यांसारख्या प्रश्नांवर पुन्हा राजकारण केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. धार्मिक ध्रुवीकरणातून निवडणुका जिंकता येतील; पण त्यातून सामाजिक सलोखा आणि लोकशाहीचे आरोग्य टिकणार नाही.

भारतातील भविष्यातील राजकारणाची दिशा आता स्पष्ट दिसतेधर्माधारित ध्रुवीकरण अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. मात्र या परिस्थितीतही भारतीय समाजाने संविधानिक मूल्ये, सर्वधर्मसमभाव आणि सहिष्णुता जपली नाही, तर देशाची लोकशाही केवळ निवडणुकांपुरती उरेल. भारताचे सामर्थ्य विविधतेत आहे, विभाजनात नाही; हे राजकीय पक्षांनी आणि समाजाने दोघांनीही लक्षात ठेवणे आज अत्यंत गरजेचे आहे.


# राहु-केतू-शनी मंदिरात शनैश्वर जयंतीनिमित्त भव्य धार्मिक कार्यक्रम

## सुमारे १३ वर्षानंतर दुर्मिळ योग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महाराष्ट्र राज्य व राज्याच्या बाहेर ख्याती असलेल्या राहुरी शहरातील श्री शनैश्वर व मारुतीरायांच्या मंदिरात पौराणिक अख्यायिका असलेले श्री राहु, केतू, मंदिरात शनिवार दिनांक १६ मे २०२६ रोजी शनैश्वर जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री ज्ञानेश्वर जयंतीच्या निमित्ताने मंदिरात अभिषेक, महाआरती आणि फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमासाठी राज्यासह अनेक भागातील हजारो शनीभक्त दर्शनासाठी या दुर्मिळ योगावर येत असतात. सुमारे १३ वर्षानंतर श्री शनी जयतीच्या निमित्ताने हा दुर्मिळ योग जुळून आलेला आहे. त्यामुळे शनैश्वर जयंती भाविकांसाठी विशेष ठरणार असून वैशाख अमावस्येला शनिवारीच शनी जयंती येण्याचा दुर्मिळ योग जुळून आल्याने भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी होण्याची शक्यता आहे.धार्मिक व अध्यात्मिक दृष्टिकोनातून हा योग अत्यंत शक्तीशाली मानला जात असून शनीभक्तांसाठी ही मोठी पर्वणी मानली जात आहे.



पौराणिक अख्यायिका नुसार या दिवशी पूजा, व्रत, अभिषेक व दान केल्याने शनी साडेसाती, ढैय्या तसेच कुंडलीतील शनी दोषांपासून मुक्ती मिळते. आणि काळे तीळ, काळे उडीद, काळे कपडे, काळी छत्री आणि लोखंडी वस्तूंचे दान करणे विशेष शुभ मानले जाते. राहुरीतील हे मंदिर महाराष्ट्रामध्ये विशेष आकर्षणाचे केंद्र मानले जाते. कारण नऊ ग्रहांपैकी राहु, केतू आणि शनी या तीन ग्रहांचे एकाच ठिकाणी असलेले हे दुर्मिळ मंदिर असल्याचे सांगितले जाते. पौराणिक मान्यतेनुसार राहूचे धड या ठिकाणी पडले म्हणून या शहराला 'राहुरी' हे नाव पडल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. राहुरी शहरातील या मंदिरात प्रत्येक शनिवारी आणि अमावस्येला मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. विशेष म्हणजे दर शनिवारी आरतीसाठी भाविकांच्या नावांची चिठ्ठी टाकून एका भक्ताला आरतीचा मान देण्याची अनोखी परंपराही येथे जपली जाते. विशेष म्हणजे या मंदिराला कुठलेही ट्रस्ट वगैरे नसून सेवाभावी मित्र मंडळाच्या वतीने श्री शनी मंदिरातील सेवा अखंड सुरू असते. श्री शनि जयंती निमित्ताने मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात जय्यत तयारी करण्यात येत आहे. शनैश्वर जयंतीनिमित्त सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता महाआरती होणार असून भाविकांसाठी फराळाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच साखर, तूप, साबुदाणा, शेंगदाणे किंवा रोख स्वरूपात दान देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी शनैश्वर सेवाभावी मित्र मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अलअमीन उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** येथे माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार यांनी स्थापित केलेल्या अलअमीन उर्दू हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे.शंभर टक्के निकालाची अनेक वर्षापासूनची असलेली परंपरा या विद्यालयाने कायम जपली आहे.

अलअमीन उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी कु.सामीया शोएब शेख ८२.६० टक्के प्रथम,कु.मुबश्शिरा मोहंमद पठाण ७८.४० द्वितीय,कु.मन्तशा इरफान कुरैशी ७५.६० टक्के तृतीय,कु.अमना अमीन शेख ७५ टक्के चतुर्थ,कु.आईशा मोहसीन शेख ७३.८० टक्के पाचवी यांनी विशेष यश संपादन केले. यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार,विश्वस्त मौलाना ईबतेहाजोद्दीन काझी,आजमखान पठाण,फारूकभाई आतार,सादिक पटेल,शमीमभाई सय्यद,फारूक रज्याक कुरैशी,फकीर मोहंमद अत्तार,सलीम शेख,मुख्याध्यापक अन्सार पठाण, सर्व शिक्षक वृंदासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## उंच माझा झोका या लेखसंग्रहास पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :**आदर्श शिक्षिका व साहित्यातील अनेक पुरस्कार प्राप्त लेखिका सौ पल्लवी संजय आल्हाट यांच्या ' उंच माझा झोका'या लेखसंग्रहास , उत्कृष्ट लेखसंग्रह राज्यस्तरीय पुरस्कारजाहीर झाला आहे.

समाजात नावलौकिक असलेल्या प्रतिष्ठित ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान ता. श्रीरामपूर यांच्यावतीने चौथे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा पार पडणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत व उपाध्यक्ष संदीप पटारे यांनी सांगितले आहे. तसेच पुस्तकाच्या लेखिका आल्हाट यांना निवड पत्र पाठवून कळविण्यात आले आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळा रुक्मिणी माधव मंगल कार्यालय टाकळीभान येथे बुधवार दि. २० मे रोजी सकाळी ९.३० ते ५ या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. पुरस्काराबद्दल पल्लवी आल्हाट यांचे अभिनंदन होत आहे.



धूत ट्रान्समिशन प्रा. लि. आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करताना कंपनी अधिकारी व पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे पदाधिकारी.

# पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयातील १०२ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात धूत ट्रान्समिशन प्रा. लि. या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू नुकताच उत्साहात पार पडला. या भरती प्रक्रियेत एकूण १८३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल १०२ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. ए. पवार यांनी दिली.

कंपनीच्या वतीने विद्यार्थ्यांची लेखी व मौखिक परीक्षा घेण्यात आली. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना निवडीची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी स्वप्ना देशपांडे आणि संदीप काथार यांनी विद्यार्थ्यांना कंपनीची कार्यपद्धती, औद्योगिक वातावरण आणि करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलचे आप्पासाहेब शेळके, डॉ. हरिभाऊ दुबे आणि डॉ. राजेंद्र गायकर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच आधुनिक कौशल्ये देण्यावर प्रवरा शैक्षणिक संकुलाने विशेष भर दिला आहे. कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणक शाखेतील विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार कौशल्यविकास करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम सातत्याने सुरू आहे.**

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती, औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये, प्रकल्पाधारित शिक्षण, संवाद कौशल्य आणि औद्योगिक भेटीद्वारे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

## संजीवनीच्या 'प्लेसमेंट मॉडेल'मुळे ३० विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या ३० विद्यार्थ्यांची विसेन इन्फोटेक या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. एकाचवेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाल्याने महाविद्यालयाच्या प्लेसमेंट परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विकसित केलेल्या विशेष 'प्लेसमेंट मॉडेल'मुळे विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश म्हणजे हमखास चांगल्या पगाराची नोकरी हे समीकरण अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त होत आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून विविध उद्योगसमूहांशी सातत्याने संपर्क ठेवला जातो. कंपन्यांच्या गरजेनुसार नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, कौशल्य विकास उपक्रम तसेच अभ्यासक्रमात आवश्यक बदल केले जातात. त्यामुळे उद्योगजगताला आवश्यक कुशल मनुष्यबळ संजीवनीतून उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांना प्राधान्याने संधी मिळत आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हर्ष बढे, रोहित बारगळ, निकित भोगे, हिमांशू छाजेड, ईश्वरी देशमुख, श्रेयश भागवत, निकिता भोर, सर्वेश्वर भुजाडे, प्रतिक बुलकुंडे,मुस्तफा कुरेशी व अनेरी ठाणगे आदींची निवड झाली आहे.

## क.जे.सोमैया हायस्कूलमध्ये दहावी-बारावीच्या गुणवंतांचा पालकांसह गौरव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** येथील हिंद सेवा मंडळ (अहिल्यानगर) संचलित क. जे. सोमैया हायस्कूलमध्ये नुकताच इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे चेअरमन रणजीत श्रीगोड हे होते. तसेच, प्रमुख अतिथी म्हणूनमाजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, बालवाडी विभागाचे चेअरमन सुशील गांधी, किशोर कुलकर्णी, स्कूल कमिटी सदस्य किशोर फुणगे, सूर्यकांत कर्नावट, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलथे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासनाधिकारी बी. एस. कांबळे, मुख्याध्यापक भूषण गोपाळे आणि रात्र प्रशालेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रकाश कुलथे, प्रशासनाधिकारी बी. एस. कांबळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष रणजीत श्रीगोड यांची भाषणे झाली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश धोंडलकर यांनी केले, तर आभार श्रीराम कुलकर्णी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल चोभे, विनायक चितळकर यांच्यासह सर्व अध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाच्या या गुणगौरव उपक्रमाचे शिक्षणप्रेमी नागरिकांकडून मोठे कौतुक होत आहे.

# स्वराज्यरक्षक,धर्मवीर,छत्रपती संभाजी महाराज

**धर्मवीर, स्वराज्यरक्षणकर्ते छत्रपती संभाजी महाराज यांची आज जयंती आहे.छत्रपती संभाजी राजेंनी आपल्या कार्यकाळात अनेक मोहिमा गाजवल्या. मात्र,एकाही मोहिमेत त्यांना अपयश आले नाही. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा करून स्वराज्य टिकवण्याचे व वाढवण्याचे काम धर्मवीर ,छत्रपती संभाजी महाराज यांनी केले. अशा महापराक्रमी,धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा..**

छत्रपती ,धर्मवीर संभाजी महाराज हे शौर्य, बुद्धिमत्ता आणि धर्मनिष्ठेचे तेजस्वी प्रतीक होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य टिकवून ठेवण्यासाठी अतुलनीय संघर्ष केला.

ज्या बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही अशा छत्रपती संभाजीराजांनी निद्रेचे चार तास सोडले तर सतत वीस तास अखंड जीवन स्वराज्य रक्षणासाठी घालविले. छत्रपती संभाजी राजांचे चरित्र त्यांचे जीवन हे सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ आणि सूर्यासारखे प्रखर तेजस्वी होते. अशा स्फटिकाप्रमाणे निर्मळ असलेल्या राजांचे चरित्र सर्वांनीच विचारात घेऊनच आचरायला हवे .छत्रपती संभाजीराजांचा जन्म पुणे जिल्ह्यातील सासवडजवळ पुरंदर किल्ल्यावर १४ मे १६५७ रोजी महाराणी सईबाई यांच्या पोटी झाला. सईबाईंचे ५ सप्टेंबर १६५९ रोजी निधन झाले.आणि संभाजीराजांचे मातृत्वाचे छत्र हरपले तेव्हा कापूरहोळ येथील धाराबाई गाडे यांना युवराज संभाजीराजांच्या दूध आई म्हणून गडावर आणले.राजमाता जिजाऊनी व सर्व सावत्र मातांनी संभाजी राजांना अगदी जीवापाड जपले जिजाऊंनी संभाजीराजांना संस्कृत ,मराठी, हिंदी व इतर भाषा आणि युद्धकलेचे शिक्षण दिले त्यामुळेच संभाजीराजे बालपणी संस्कृत पंडित व उत्तम योद्धा म्हणून नावलौकिकास पावले. वयाच्या आठव्या वर्षी स्वराज्यरक्षणासाठी संभाजीराजे राजकारणात आले. दिलेरखान व जयसिंगाशी छत्रपती शिवरायांनी केलेल्या पुरंदरच्या तहाच्या पूर्ततेसाठी व उर्वरित स्वराज्य रक्षणासाठी आठ-साडे आठ वर्षाच्या संभाजी राजांना मोगलांकडे ओलीस रहावे लागले.

राजमाता जिजाऊंच्या संस्कृत शिक्षणाचा परिणाम छत्रपती संभाजीराजांवर



झाल्याने राजांनी वयाच्या चौदाव्या वर्षी बुद्धभूषण नावाच्या संस्कृत ग्रंथांची निर्मिती केली तसेच नखशिखा,नायिकाभेद व सात सतक हे तीन ग्रंथ लिहिले. म्हणजेच बालवयातच ग्रंथ लेखन करणारे छत्रपती संभाजी महाराज हे प्रतिभावंत लेखक होते . छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली. संभाजी महाराजांनी गनिमीकाव्याचा चपखलपणे वापर करत शत्रूंना अक्षरशः झुंजवले, लोळवले आणि परास्त केले. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत सुमारे १२० युद्धे केल्याची नोंद आढळते. मात्र, एकाही लढाईत ते कधीही पराभूत झाले नाहीत. संगमेश्वर येथे कैद केलेल्या छत्रपती संभाजी महाराजांना १५ फेब्रुवारी १६८९ रोजी औरंगजेबाच्या बहादूर गड येथील छावणीत आणण्यात आले.

संभाजीराजांवर ह्या ठिकाणी धर्मांतरासाठी त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला. छत्रपती संभाजी राजांनी सर्व किल्ले मुघलांच्या स्वाधीन करून धर्मांतर केल्यास जीवदान देण्याची अट औरंगजेबाने घातली होती. मात्र, संभाजी राजेंनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. औरंगजेबाने संभाजी राजेंवर अनन्वित अत्याचार केले. असह्य यातना सहन करूनही छत्रपती संभाजीराजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही.

क्रूर औरंगजेबाने संभाजी राजेंवर अनन्वित अत्याचार केले.अत्याचाराने परिसीमा गाठली, तरी संभाजी महाराजांच्या मुखातून आक्रोशाची लकेर ही उमटली नाही. धर्माभिमानी, लढवय्या, असामान्यशौर्य, पराक्रम, कर्तृत्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही.अखेर फाल्गुन अमावास्या म्हणजेच,११ मार्च १६८९ रोजी छत्रपती संभाजीराजे व कवी कलश यांना मृत्युदंड देण्यात आला.

सात लाख मोगली सेनाविरुद्ध मुठभर मराठे ६३ वर्षाचा कुटील औरंगजेबाविरूद्ध २४ वर्षाचे छत्रपती संभाजीराजे सर्वात शक्तिशाली मोगली सामर्थ्य आणि तीन चार जिल्ह्यांनी इतके स्वराज्य असा विषम लढा छत्रपती संभाजी महाराजांनी महाराष्ट्रात नऊ वर्ष सुरू ठेवला. रामशेज किल्ल्याच्या पराभवाने चिडलेल्या औरंगजेबाने जोपर्यंत संभाजी राजांना पकडणार नाही तोपर्यंत डोक्यावर पगडी घालणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती असे होते छत्रपती संभाजीराजांचे कर्तुत्व.

छत्रपती संभाजी राजांचे बलिदान स्थान आत्ताच्या तरुण पिढीचे स्फूर्तिस्थान होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना जयंतीनिमित्त मानाचा मुजरा.**

**।। देश धर्म पर मिटने वाला शेर शिवा का छावा था**

**महापराक्रमी महाप्रतापी एक ही शंभूराजा था ।।**

**लेख :**

**प्रा.साईप्रसाद प्रमोद कुंभकर्ण ,**

**संपर्क : ९०११८९०२७९**

**इतिहास अभ्यासक,व्याख्याते**

# ऑपरेशन मुस्कान अभियानांतर्गत १०९ व्या मुलींचा शोध, आरोपी गजाआड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : तालुक्यातील एका १६ वर्षे ७ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून कोणाला काही एक न सांगता निघून गेली होती व ती परत आली नाही म्हणून आपल्या मुलीचे अपहरण झाल्याबाबत मुलीच्या पालकांनी अज्ञात आरोपीविरुद्ध राहुरी पोलीसात सविस्तर फिर्याद नोंदवली त्यांच्या फिर्यादीनुसार गुन्हा रजिस्टर नंबर ४४८ / २०२६ भारतीय न्याय संहिता १३७ (२) ,८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरील गुन्हयांमध्ये पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी सचिन दिलीप शिंदे (वय २८) यांस दि. ११ मे २०२६ रोजी रात्री पावणे बाराच्या सुमारास राहुरी पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली होती.

त्यास पोलीसांनी विश्वासात घेवुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांनेच सदर मुलगी मित्राचे मदतीने लग्न करण्यासाठी पळवुन नेल्याची कबुली दिली.

सदरची मुलगी आश्वी पोलीस हद्दीत असल्या बाबत पो. हे. कॉ. राजु पुंड ह्यांना आरोपी मार्फत माहिती भेटल्याने त्यांनी सदर माहिती राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना कळविल्याने त्यांनी सदरची माहिती राहुरी पोलीस स्टेशनचे तपसी अंमलदार पो.हे.कॉ. राजु पुंड ,पो.हे.कॉ. रामनाथ सानप , पो.कॉ. गणेश मैड यांना सदर मुलीची माहिती देऊन काल दिनांक १३ मे २०२६ रोजी मुलीचा शोध घेऊन त्या मुलीस राहुरी पोलीस स्टेशन येथे आणून पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन श्रीरामपूर विभागाचेअप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपूरचे जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे नेतृत्वात पो.हे.कॉ. राजु पुंड ,पो. हे.कॉ. रामनाथ सानप , पो.कॉ.गणेश मैड पो. हे. कॉ. सचिन धनाड पो. हे. कॉ. दरेकर पो. ना. वेताळ यांच्या पथकाने केली आहे.

# सभासदांनी दाखविला समतावर विश्वास; १५ टक्के लाभांश खात्यात जमा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पोहेगाव** : गेल्या चार दशकांपासून सभासदांचा विश्वास संपादन करत यशस्वी वाटचाल करणाऱ्या समता नागरी सहकारी पतसंस्थाच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी पुन्हा एकदा संस्थेवर ठाम विश्वास व्यक्त केला. स्व. यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात झालेल्या सभेत सर्व ठराव हात वर करून एकमताने मंजूर करण्यात आले. सभेत चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा (काका) कोयटे यांनी संस्थेच्या सर्व ठेवी १०० टक्के सुरक्षित असल्याचा विश्वास व्यक्त केला.

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे ११२८ कोटी रुपयांच्या ठेवी असून ८२४ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच ३१६ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक असून सोनेतारण कर्ज योजनेंतर्गत ५८५ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. आर्थिक वर्षअखेर संस्थेला १३ कोटी रुपयांचा ढोबळ नफा झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

काका कोयटे म्हणाले, सभासदांनी गेल्या ४० वर्षांपासून ठेवलेला विश्वास हीच संस्थेची खरी ताकद आहे. भविष्यात अधिक पारदर्शक व सुरक्षित सेवा देण्याचा आमचा संकल्प आहे. व्हाइस चेअरमन अरविंद पटेल यांनी समता म्हणजे कुबेराचा खजिना असून तो कधीही रिकामा होणार नाही, असे सांगितले. सरव्यवस्थापक सचिन भट्टड यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे संस्थेची राज्यात वेगळी ओळख निर्माण झाल्याचे नमूद केले. सेल्फ बँकिंग प्रणाली, व्हाऊचरलेस व्यवहार आणि मिस्ड कॉलवर ओटीपीद्वारे पैसे मिळण्याची सुविधा यामुळे ग्राहकांचा वेळ वाचत असल्याचे त्यांनी सांगितले. सभेत १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. विशेष म्हणजे, सभा संपताच लाभांशाची रक्कम सभासदांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली. मोबाईलवर एसएमएस मिळताच सभागृहात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

संस्थेच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त नफा वाटपातून २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून सप्टेंबरमध्ये सर्व सभासदांचा सत्कार व भेटवस्तू वितरण होणार असल्याची घोषणा करण्यात आली. सभेस संचालक मंडळ, मान्यवर आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

# शिवाजीराव कपाळे यांना पसायदान पुरस्कार प्रदान




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : आनंदवन सेवाभावी संस्था यांच्या वतीने दिला जाणारा पसायदान पुरस्कार साई आदर्श मल्टीस्टेटचे संस्थापक शिवाजीराव कपाळे यांना नुकताच प्रदान करण्यात आला. उद्धव महाराज मंडलिक, सुनीताताई गडाख, पंढरीनाथ महाराज तांदळे, सूर्यकांत नेटके, डॉ. संजय सोनवणे, उषा दीदी व्यासपीठावर उपस्थित होते..साई आदर्शच्या माध्यमातून आदर्श व्यवहारामुळे सहकार क्षेत्रामध्ये साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांनी आपला वेगळा ठसा व अस्तित्व जिल्ह्यामध्ये निर्माण करून यशाच्या शिखराला गवसणी घातली आहे.

त्यामुळे कपाळे यांना हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले पारदर्शक व आर्थिक व्यवहारातून नगर जिल्ह्यामध्ये हजारो खातेदारांचा विश्वास संपादन करणारी साई आदर्श सहकारी क्षेत्रात अल्पावधीत आपल्या कर्तुत्वाचा बळावर नावलौकिकास पात्र ठरलेली आहे अर्थकारणा बरोबरच सामाजिक कामातही संस्था आघाडीवर असल्याने या संस्थेचे प्रशासन चोख पद्धतीने बजावणारे चेअरमन कपाळे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्कारानंतर कपाळे म्हणाले की सहकार चळवळ ही ग्रामीण भागात आर्थिक नाडी म्हणून ओळखली जाते ही चळवळ आणखी वाढावी निकोप व्हावी अशी अपेक्षा आहे. या प्रसंगी सुदामराव तागड, डॉ. बाबासाहेब शिरसाठ, शिवासेठ बाफना, बडे मामा, खाडे महाराज, पत्रकार सुखदेव फुलारी, विनायक दरंदले, संजय गर्जे, गणेश डोंगरे,भाऊसाहेब ठोसर, डॉ. रामनाथ बडे आदी उपस्थित होते.

# हनुमंतगावच्या सृष्टी गावडेची एम्समध्ये निवड; देशात ६१ वा क्रमांक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**सोनगाव** : जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवत संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथील सृष्टी भास्कर गावडे यांची अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्समध्ये नर्सिंग ऑफिसर पदासाठी निवड झाली. प्रतिष्ठेच्या नर्सिंग ऑफिसर रिक्रूटमेंट कॉमन एलिजिबिलिटी टेस्ट १० परीक्षेत त्यांनी देशभरात ६१ वा क्रमांक पटकावला आहे.

या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या त्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिल्या विद्यार्थिनी ठरल्या आहेत. केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या देशातील सर्वोच्च वैद्यकीय संस्थांपैकी एक असलेल्या मार्फत ही परीक्षा घेण्यात आली होती. एप्रिल महिन्यात दोन टप्प्यांत पार पडलेल्या परीक्षेसाठी देशभरातून तब्बल ९२ हजार २६ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी केवळ १४ हजार ५२७ विद्यार्थी दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र ठरले होते. देशभरातील विविध एम्स रुग्णालयांतील नर्सिंग ऑफिसर पदाच्या २ हजार ७७९ जागांसाठी ही स्पर्धा होती. पहिल्या टप्प्यात पात्रता गुण मिळवणे आवश्यक असताना अंतिम निवडीसाठी दुसऱ्या टप्प्यात उच्च गुणांची आवश्यकता होती. अशा अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत कु. सृष्टी गावडे यांनी दुसऱ्या टप्प्यात तब्बल ८० टक्के गुण संपादन करत राष्ट्रीय स्तरावर ६१ वा क्रमांक मिळवला. ग्रामीण पार्श्वभूमी, मर्यादित साधने आणि स्पर्धेचे मोठे आव्हान यांवर मात करत त्यांनी मिळवलेले हे यश विशेष उल्लेखनीय मानले जात आहे.

कुटुंबीयांनी या यशाचे श्रेय सृष्टी यांच्या अथक परिश्रमाला, शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि कुटुंबाच्या पाठिंब्याला दिले. एम्ससारख्या देशातील सर्वोच्च वैद्यकीय संस्थेत निवड झाल्याने हनुमंतगावसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# अवैध धंद्याविरोधात पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी उघडली मोहीम !

## शहरात तीन ठिकाणी पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शहरातील अवैध धंद्यांविरोधात पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिसांनी धडक कारवाई करत कल्याण मटका चालविणाऱ्या एका आरोपीस भाजी मंडई परिसरातून ताब्यात घेतले आहे. राहुरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल नदीम मोहम्मदजाफर शेख हे आपल्या सहकाऱ्यांसह पोलीस ठाण्यात हजर असताना पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार स.फौ. तुळशीराम गिते, पो.हे.कॉ. विजय नवले, पो.कॉ. जयदीप बडे यांच्यासह दोन पंचांना घेऊन पोलिस पथकाने अवैध धंदा करणाऱ्या तीन ठिकाणी कारवाई केली. भाजी मंडई परिसरातील एका पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला विजय अशोक सरोदे ,वय ३०, रा. प्रगती विद्यालय समोर, राहुरी हा इसम हातात पॅड, पेन, कार्बन व मटका आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या घेऊन बसलेला आढळून आला. चौकशी केली असता तो कल्याण मटका खेळत व खेळवित असल्याचे समोर आले. पोलिसांनी पंचांसमक्ष आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून ३२० रुपये रोख रक्कम तसेच मटका खेळासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमाल करून पंचनामा करण्यात आला.

बसस्थानक परिसरात असलेल्या मल्हारवाडी चौक परिसरात अवैध जुगारावर पोलिसांनी दुसरी कारवाई करून एका व्यक्तीला रंगेहात पकडले आहे. बसस्थानकाजवळ पत्र्याच्या टपरीआड एक संशयास्पदरीत्या बसलेला इसम आढळून आला असता पोलिसांनी पंचासमक्ष अचानक छापा टाकून त्याला ताब्यात घेतले असता, त्याने स्वतः चे नाव बाळासाहेब रामचंद्र काळे (वय ३८, रा. टाकळीमियाँ, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) असे सांगितले. चौकशीत त्याच्याकडून कल्याण मटका नावाचा जुगार खेळला व चालवला जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून ३१० रुपये रोख रक्कम तसेच पेन, कार्बन आणि आकडे लिहिलेल्या कागदी चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या. सर्व मुद्देमाल पंचनामा करून सील करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांचा कडक कारवाईचा संदेश गेला असून त्यामुळे अवैध धंदा करणाऱ्यांनी पोलिसांचा धसका घेतला आहे. मल्हारवाडी चौक परिसरात सापळा रचून अवैध धंद्यावरील तिसरी कारवाई करून छापा टाकला असता पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला बसून कल्याण मटका खेळवित असलेला संतोष जगन्नाथ वाणी (वय ४२, रा. काळुबाई मंदिर परिसर, राहुरी बु., ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीच्या झडतीदरम्यान ३२५ रुपये रोख रक्कम, मटक्याच्या आकड्यांच्या चिठ्ठ्या, पेन व कार्बन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/ १०४/२०२०
नेवासा दिनांक. १५/०४/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-सोन्याबापू अर्जुन पिटेकर रा. हंडिनिमगांव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/ श्रीम. कु. नैतिक सोन्याबापू पिटेकर रा. हंडिनिमगांव यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-नैतिक सोन्याबापू पिटेकर, गावाचे नाव-हंडिनिमगांव, जन्म दिनांक-१४/१२/२०२४

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# द•ख•ल

## हरवलेला मोबाईल अवघ्या दोन तासांत शोधून मालकाच्या स्वाधीन



**नेवासा** : शहरातील येथील रहिवासी राजेश श्रीकिसन उपाध्ये (वय ४५) यांचा 'ओप्पो ए -१७ हा मोबाईल मंगळवारी दि.११ मे रोजी दुपारी हरवला होता. यासंदर्भात त्यांनी तातडीने नेवासा पोलीस ठाणे येथे माहिती दिली. तक्रार प्राप्त होताच नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक नारायण डमाळे आणि पोलीस कॉन्स्टेबल एच. पी. धायतडक यांनी तांत्रिक तपास करून मोबाईल हरवल्यानंतर अवघ्या दोन तासांच्या आत पोलिसांनी तो शोधून काढला. पोलिसांनी तातडीने शोधलेला मोबाईल तक्रारदार श्री. उपाध्ये यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. आपला मोबाईल अत्यंत कमी वेळात परत मिळाल्यामुळे उपाध्ये यांनी नेवासा पोलिसांच्या तत्परतेचे आणि कार्यक्षमतेचे विशेष कौतुक करून समाधान व्यक्त केले आहे.

## राहीबाई पोपरे यांना मातोश्री पुरस्कार प्रदान



**पुणतांबा** : गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या मुक्ताईज्ञानपीठामार्फत चालू वर्षी स्व. चंद्रभागाबाई बुधवंत यांच्या नावाने देण्यात येणारा मातोश्री पुरस्कार बीजमाता राहीबाई पोपरे यांना नुकताच प्रदान करण्यात आला. मुक्ताई ज्ञानपीठामार्फत मुक्ताई यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय किर्तन महोत्सवात मंहत रामानंद गिरी महाराज यांच्या हस्ते या पुरस्काराचे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. यावेळी साध्वीराधाताईसानप यांचे किर्तन झाले. त्यांनी परमार्थाचे महत्व तसेच आदिशक्ती मुक्ताई मातेच्या जीवनावर विवेचन करून संताचे महत्व पटवून दिले. तसेच मुक्ताई ज्ञानपीठ मार्फत आजही सुरू असलेल्या विविध उपक्रमाबाबद मंहत रामानंद गिरी महाराज यांचे कौतुक केले. यावेळी परिसरातील उत्तम महाराज गाडे माजी सरपंच मुरलीधर थोरात हभप महेश मुरुदग्ण, ताराचंद पेटकर, धनजंय जाधव सह अनेक जण उपस्थित होते. किर्तनानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा




**वडाळा महादेव** : शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुल, वडाळा महादेव येथील सुप्रिया सुळे कॉलेज ऑफ नर्सिंग व श्रुती नर्सिंग स्कूल येथे जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी जागतिक परिचारिका दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये परिचारिकांवर निबंध स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन, रांगोळी स्पर्धा तसेच भाषण स्पर्धांचा समावेश होता. कार्यक्रमासाठी शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुलाचे सर्वे सर्वा अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुलाचे संचालक आदरणीय दिलीपदादा पवार उपस्थित होते. तसेच प्रतिभाताई पवार फार्मसी कॉलेज चे प्राचार्य, प्रो. अभिषेक सेन, अजितदादा पवार पॉलिटेक्निक कॉलेजच्या प्राचार्या प्रो. पूनम बोधक,शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज चे प्राचार्य. डॉ रिजवान अहमद, आप्पासाहेब जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# संगमनेर तालुक्याला उन्हासह नेतृत्वाचे चटके?

## नवीन लोकप्रतिनिधीकडून अपेक्षित कामे होत नसल्याची नागरिकांत संतप्त भावना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : तालुक्यात वाढत्या उन्हाच्या झळांसोबतच नेतृत्वाच्या अभावाचे चटकेही नागरिकांना बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे. मागील अनेक वर्षे बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील विविध प्रश्नांना तत्काळ प्रतिसाद मिळत होता.

मात्र सध्या पाणीटंचाई, रखडलेली विकासकामे आणि प्रशासकीय अडचणींमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे. अल्प पर्जन्यमानाचा प्रदेश असलेल्या संगमनेर तालुक्यात मागील काळात विविध विकासकामांमुळे मोठी प्रगती झाल्याचे सांगितले जाते. निळवंडे धरणाच्या डावा व उजवा कालव्यांमुळे दुष्काळी भागाला पाणी मिळाले, तर शहरात थेट पाईपलाईन योजनेतून स्वच्छ पाणीपुरवठा सुरू झाला.

> काकडवाडीचे सरपंच जनार्दन कासार व सुनील कासार यांनी सांगितले की, पाण्याच्या प्रश्नासाठी आम्ही पाठपुरावा केला असता शाश्वत उपाययोजनांसाठी मदत मिळाली. मात्र सध्याच्या नेतृत्वाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

त्यामुळे तालुक्यात स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र यंदाच्या उन्हाळ्यात तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. १८ गावांतील ३४ वाड्यांना १३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला तरी तो अपुरा ठरत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे.

चौधरवाडी, कुंभारवाडी, वरवंडी, खंडेरायवाडी, साकुर, पिंपळगाव देपा, माळेगाव पठार, दरेवाडी, पोखरी बाळेश्वर, खरशिंदे, नान्नज दुमाला, पारेगाव खुर्द, कवठे मलकापूर आणि काकडवाडी या भागांत पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, काही गावांतील नागरिकांनी बाळासाहेब थोरात यांच्याकडे मागणी केल्यानंतर राजहंस दूध संघाचे टँकर उपलब्ध करून दिल्याचा दावा करण्यात आला आहे. याउलट विद्यमान लोकप्रतिनिधींनी काही ठिकाणी केवळ नावापुरते टँकर पाठवून फोटोसेशन केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

युवक काँग्रेसचे सरचिटणीस सोमनाथ गडाख यांनी तालुक्यात नव्याने कोणतीही विकासकामे होत नसल्याचा आरोप केला. पिकविमा प्रश्नातही तालुक्याला न्याय मिळाला नसल्याची टीका त्यांनी केली.

पान १ वरुन

## मित्रांना वाचवण्यासाठी जाम खेडकरांना वेठीस धरले

ताफ्यात फिरतात. मग त्यांच्या गाड्या पाण्यावर चालतात का? असा उपरोधिक सवाल त्यांनी केला.

राम शिंदे यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, ते विमान आणि हेलिकॉप्टरने फिरतात. मात्र मतदारसंघाच्या विकासासाठी त्यांच्या पदाचा उपयोग झालेला दिसत नाही. जमीन घोटाळा असो, पेपरफुटी असो किंवा स्थानिक विकासकामांतील अडथळे असोत, प्रत्येक ठिकाणी सामान्य माणूस भरडला जात असल्याचा आरोप करत पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

## निट पेपरफुटीचे कनेक्शन अहिल्यानगर जिल्ह्यात....

तालुक्यात आले होते. धनंजय लोखंडे याला पुण्यातील वाघोली परिसरातून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती त्याच्या कुटुंबीयांनी दिली आहे. सदर घटने संबंधित कुटुंबीयांनी दिलेली प्रतिक्रिया अशी की तो असे काही करेल असे वाटत नाही, असे सांगून माध्यमांसमोर बोलण्यास कुटुंबीयांनी नकार दिला आहे, या प्रकरणाबाबत आम्हाला कोणतीही माहिती नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या सीबीआय कडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, नीट पेपरफुटी रॅकेटच्या धागेदोऱ्यांचा कसून शोध घेतला जात आहे. दरम्यान घडलेल्या या घटनेमुळे नीट पेपर फुटीचे प्रकरण थेट राहुरी तालुक्यात पोहोचल्यामुळे राहुरी तालुक्यासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. पुण्यातून महिलेपाठोपाठ तरुणाला अटक, शुभम चा भाऊदेखील पकडला- सीबीआयने पुण्यातील बिबवेवाडी येथून एका महिलेला अटक केली होती.

त्या महिलेला सीबीआयच्या ताब्यात देण्यात येणार होते. त्यातच, आता आणखी एकास पुण्यातून अटक करण्यात आली आहे. दुसरीकडे नाशिकमधील शुभम खैरनारच्या घरी जाऊन पोलिसांची झाडाझडती सुरू आहे. नीट प्रकरणातील चौकसाठी सीबीआयने आरोपी शुभम खैरनारच्या भावालाही ताब्यात घेतले आहे.

## पोलिस बंदोबस्तातच गोळीबार...तरीही गुन्हा नाही!

सांगितले जात आहे. पिंपरी शहाली गावातीलच दोन गटांमध्ये हा वाद झाला. आता सुयशचे साथीदार कोण? आणि विरोधक कोण? हे शोधण्याचे आव्हान पोलिसांपुढे आहे.

दरम्यान, अधिकृत तक्रार दाखल झालेली नसल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवलेला नाही, अशी माहिती मिळत आहे. मात्र जर पोलिसांच्या बंदोबस्तातच कथित गावठी कट्टे फिरत असतील आणि गोळीबार होत असेल, तर कायद्याचा धाक नेमका कुठे आहे? पोलीस स्वतःहून पुढे येऊन गुन्हा दाखल का करत नाहीत? पोलीसही गुंडांना घाबरतात का? असे प्रश्न आता उपस्थित होऊ लागले आहेत.

या संपूर्ण प्रकरणामुळे नेवासा तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. आता पोलीस निरीक्षक सागर ढिकले, पोलीस उपाधीक्षक नीरज राजगुरू आणि पोलीस अधीक्षक ममुक्का सुदर्शन काय भूमिका घेणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

मध्यस्थ आणि बघ्याच्या भूमिकेत पोलीस..? - विशेष म्हणजे, या बैलगाडा शर्यतीसाठी पोलिस बंदोबस्त तैनात होता. मग पोलिसांच्या उपस्थितीत कथित गोळीबार, मारामारी आणि दहशत माजवली जात असताना पोलिसांनी बघ्याची भूमिका का घेतली? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. यात्रेच्या आदल्या दिवशीही डीजे वादनाच्या कारणावरून गावात वाद आणि मारामाऱ्या झाल्या होत्या. त्यावेळी पोलिसांनी मध्यस्थी केली होती; मात्र कठोर कारवाई झाली नसल्याने संबंधित टोळीचे मनोबल वाढल्याचा आरोप होत आहे.

## पुण्यात हॉस्पिटलसमोर सापडला जिवंत बॉम्ब

उधाण आले आहे. यामागे एखाद्या रुग्णाच्या नातेवाईकाचा राग, उपचारातील असंतोष, बिलावरील वाद किंवा इतर कोणते आर्थिक-वैयक्तिक कारण असू शकते का, अशा अनेक शक्यता वर्तवल्या जात आहेत. परिसरात अफवांचे पीक पिकले आहे.

पोलीस आणि संबंधित सुरक्षा यंत्रणा या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. सीसीटीव्ही फुटेज, हॉस्पिटलमध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्तींची नोंद, त्यांची हालचाल आणि उपलब्ध तांत्रिक पुराव्यांच्या आधारे गुन्हेगारास लवकरात लवकर पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# डॉ. गौरी चौरे आत्महत्या प्रकरण

### आरोपींच्या अटकेसाठी पारनेर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : गोरगाव येथील महिला डॉ. गौरी सुनील चौरे आत्महत्या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने संतप्त नागरिकांनी आज पारनेर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन छेडले. दहा दिवस उलटूनही पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत नागरिक, नातेवाईक तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यात जमले होते. आरोपींना तात्काळ अटक करा तसेच पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

महिला डॉ. गौरी चौरे यांना हुंड्यासाठी तसेच मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू व सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र आरोपी अद्याप फरार असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. आंदोलनामुळे काही काळ पोलीस ठाणे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने पोलिस प्रशासनाला दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. पहिल्या निवेदनात डॉ. गौरी चौरे यांनी गोरेगाव येथे आत्महत्या केल्याचा उल्लेख करत त्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पती, सासू व सासऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आरोपी खुलेआम फिरत असून त्यामुळे पुरावे नष्ट होण्याची तसेच पीडित कुटुंबीयांवर दबाव आणण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. आरोपींना त्वरित अटक करून कठोर शिक्षा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला.

महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये तत्काळ कारवाई होणे आवश्यक असताना या प्रकरणात दहा दिवस उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने पोलिसांवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



### आमदार दाते यांनी घेतली दखल

आंदोलनाची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी तातडीने डी.वाय.एस.पी. शिरीष वमणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची गंभीरता निदर्शनास आणून दिली. त्यानंतर डी.वाय.एस.पी. वमणे तातडीने पारनेर पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्यांनी उपस्थित ग्रामस्थांशी चर्चा करून येत्या तीन दिवसांत संबंधित आरोपींना अटक करण्याचे स्पष्ट आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

## चेक बाऊन्स प्रकरणी कर्जदारास तीन महिन्यांची शिक्षा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारणावर घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता दिलेला धनादेश अनादरीत झाल्याप्रकरणी अहमदनगर येथील न्यायालयाने कर्जदार कैलास मारुती भोसले यांना तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच ९ लाख २७ हजार ४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कैलास मारुती भोसले यांनी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारण कर्ज घेतले होते. संबंधित कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांनी पतसंस्थेला धनादेश दिला होता. मात्र हा धनादेश बँकेत सादर केल्यानंतर अनादरीत झाला. त्यानंतरही आरोपीने कर्जाची रक्कम मुदतीत भरली नसल्याने पतसंस्थेने अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट कलम १३८ अंतर्गत एससीसी केस क्रमांक ६१२६/२०२४ दाखल केली होती. सदर प्रकरणाची गुणदोषांवर सुनावणी झाल्यानंतर न्यायाधीश जी. जी. सोनी यांनी आरोपी कैलास भोसले यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फिर्यादी संस्थेस ९,२७,४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, निकालाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नुकसानभरपाईची रक्कम न भरल्यास आरोपीस अतिरिक्त सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. या प्रकरणात फिर्यादी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने ड. युवराज पाटील, ड. गणेश दरेकर यांनी कामकाज पाहिले.

## पाटणी विद्यालयात आराध्या गर्जे प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. आराध्या हरीश गर्जे हिने ९०.४०% गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला. चि.सोहम अतुल लोंढे, ८९.२०%, मान्यता किशोर नागले ८८.६० टक्के, अमित नितीन कापुरे ८८.६०% गुण मिळवत द्वितीय- तृतीय क्रमांक मिळवला. अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक शिरसाठ यांनी दिली. या यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, उपाध्यक्ष रवींद्र गुलाटी,मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, कार्यकारणी सदस्य अनिल देशपांडे, अशोक उपाध्ये, माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे व सर्व स्कूल कमिटी सदस्य आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक दीपक शिरसाठ,नितीन यशवंत, अनुप्रिती पवार यांच्यासह सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## टाकळीभानला आज छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : येथे आज गुरूवार दि. १४ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जयंती उत्सव सोहळा मोठ्या दिमाखात साजरा होणार असल्याची माहीती आयोजक धर्मवीर छत्रपती संभाजी राजे



युवा प्रतिष्ठाणच्या वतीने देण्यात आली आहे.

सकाळी ठीक ९ वा. धर्मवीर संभाजीराजे यांचे प्रतिमा पुजन, ९.२० वा. स्टॅन्ड परिसर पोलीस स्टेशन समोर महाआरती सोहळा ह.भ.प. विश्वनाथगिरीजी महाराज श्री क्षेत्र घोगरगाव तसेच ह.भ.प. कृष्णा महाराज वाघुले, टाकळीभान यांच्या शुभहस्ते संपन्न होईल. तद्रंतर सायं. ५ वा. पारंपारीक वाद्यांच्या गजरात टाळकरी मंडळ व बालसमूहसह भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार असून या जयंती उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन छत्रपती संभाजीराजे युवा प्रतिष्ठाण व टाकळीभान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुणतांबा येथे त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचा ध्वजारोहन सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : येथील चांगदेव महाराज मंदिर परिसरात असलेल्या सद्गुरू गंगागिरी महाराज आश्रम येथे १७मे२० मे पर्यंत सुरु होणाऱ्या त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह व गुरुचरित्र पारायण सोहळ्याच्या निमित काल सकाळी ११ वाजेच्या दरम्यान अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला नियोजनाचा अभाव व समन्वय नसल्यामुळे ध्वजारोहण सोहळा दीड तास उशिराने सुरु झाला.

कडक उन्हामुळे कार्यक्रमास उशिर झाल्यामुळे भाविकांनी तीन नाराजी व्यक्त केली आश्रमाचे काम पाहणारे हभप विजयानंद गिरी महाराज व डॉ धनवटे व यांच्या हस्ते पूजन करून ध्वजारोहण




करण्यात आले. यावेळी योगीराज चांगदेव महाराज देवस्थानचे विश्वस्त महेश मुरुदगण, माजी सरपंच दिनकर भोरकडे, भोला उदावंत, प्रा. डॉ. एसआर बरवळे, चंद्रकात वाटेकर, आबा नळे, बाळासाहेब वाणी, एकनाथ धनवटे, भिकाजी जाधव, गोरख पानसरे, संग्राम बोर्डे, लहानुधनवटे सह अनेक भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### बाळासाहेब रोटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : येथील स्वस्तिक मशिनरीचे मालक बाळासाहेब बाबुराव रोटे (वय-७४) यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. ते बबनराव रोटे यांचे धाकटे बंधू, सागर, अजित व समीर रोटे यांचे वडील, रितेश (आबा), अमोल व गणेश रोटे यांचे चुलते होत.

### सौ.उषाताई कोरेकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील खलाल पिंप्री येथील वारकरी संप्रदायातील सेवेकरी उषाताई बहिरु कोरेकर (वय ५३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा, पुतणे असा परिवार आहे. संत चरित्र लेखक वै. हभप नासिकेत महाराज कोरेकर यांच्या त्या भावजाई, संतसेवक बहिरुतात्या कोरेकर यांच्या पत्नी तर गोपीनाथ कोरेकर व संतोष कोरेकर यांच्या त्या चुलती,युवा कीर्तनकार हभप शशिकांत महाराज कोरेकर यांच्या त्या आजी होत्या.

### रामचंद्र निकम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील रामचंद्र जगन्नाथ निकम (वय ७१)यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी मुले चार बंधू एक सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मणराव निकम सर यांचे ते बंधू तर ज्येष्ठ शिक्षक अशोक आघाडे यांचे मामा व बाळासाहेब, प्रमोद, योगेश, सुमित निकम यांचे ते वडील होत.

## श्रीरामपूर उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग विशेष तपासणी शिबिर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शिवसेना दिव्यांग सेलच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून दिव्यांग बांधवांसाठी विशेष तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामुळे श्रीरामपूरसह कोपरगाव, संगमनेर, अकोले आणि राहाता तालुक्यातील दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे तपासणी व प्रमाणपत्र वाटप उपजिल्हा रुग्णालयात दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या बुधवारी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत नेत्र व अस्थिव्यंग तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. आजच्या विशेष कॅम्पमध्ये अनेक दिव्यांगांनी आपली नोंदणी व तपासणी करून घेतली. लोकप्रतिनिधींकडून पाहणी व चर्चा या शिबिरादरम्यान माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांनी रुग्णालयाला भेट दिली त्यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक परदेशी अस्थीरोग तज्ञ डॉ. पारधे आणि नेत्ररोग तज्ञ डॉ. कुलकर्णी यांच्याशी सविस्तर चर्चा केली. रुग्णालयात दिव्यांगांसाठी आवश्यक असलेल्या ज्या सुविधा सध्या अपुऱ्या आहेत, त्या लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन कांबळे यांनी यावेळी दिले थेट संवाद आणि समस्या निवारण शिबिरात उपस्थित असलेल्या दिव्यांग बांधवांशी माजी आमदारांनी थेट संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेतानाच, पुढील काळात या सुविधा अधिक सक्षमपणे आणि सुलभतेने कशा मिळतील, याकडे विशेष लक्ष दिले जाईल असे त्यांनी सांगितले.

**Change of name**

My old name is **Surabhi Rajkumar Kasliwal** and my new name is **Surbhi Latesh Pahade** both people are the same.
Aadhar Card No : 2921 5861 6399

# कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने दिव्यांग निधीचे वाटप : गटनेत्या गौरी पहाडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने शहरातील दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दिव्यांग कल्याण निधी वितरित करण्यात येणार आहे. नगरपरिषदेच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ शहरातील जास्तीत जास्त पात्र दिव्यांग व्यक्तींनी घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी केले आहे.

नगरपालिका प्रशासनाच्या नियमानुसार पालिकेच्या एकूण उत्पन्नापैकी ५ टक्के निधी हा केवळ दिव्यांग व्यक्तींच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी वापरला जातो. या निधीच्या माध्यमातून दिव्यांगांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणींवर मात करण्यासाठी थेट अर्थसहाय्य केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने दिव्यांग बांधवांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वैद्यकीय उपचार आणि आवश्यक ती सहायक उपकरणे खरेदी करण्यासाठी मदत केली जात आहे. याकरिता दिव्यांग बंधू भगिनींकडे ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असून दिव्यांग बंधू भगिनी कोपरगाव नगरपरिषद हद्दीत कायमस्वरूपी रहिवासी हवे आहेत.



अश्या सर्व लाभार्थ्यांनी आपले आधार कार्ड, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र आणि बँक पासबुक झेरॉक्स प्रत नगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे १८ मे या अंतिम तारखे पर्यंत जमा करावे. आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या प्रत्येक घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शहरातील प्रत्येक घटकाला सक्षम करण्याचा आ. आशुतोष काळे यांचा मानस आहे.

यामुळे कोपरगाव शहरातील एकही पात्र दिव्यांग व्यक्ती या लाभापासून वंचित राहू नये ही आमची प्रामाणिक भावना असल्याने शहरातील पात्र दिव्यांग बंधू भगिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा. दिव्यांग बांधवांना कोणत्याही प्रकारची अडचण भासल्यास आ. आशुतोष काळे यांच्या संपर्क कार्यालयाशी किंवा ९९२२३१०००४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी केले आहे.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .१४ मे २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१७९ २७८ ३७७ — ७-६ — १५० २४० ६००

जोड ७०-४६-३१ २५-६९

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१४५ २३५ ५५० — ०-३ — १२० ६७० ३००

जोड ०७-१३-२६- ८९-३४

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

१५६ १२९ ११० — २-४ — १३० १४९ ११२

जोड २०-८४-५१- ७९-४३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द•ख•ल

## माहिनूर शेखचे सुयश



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील विद्यार्थिनी माहिनूर आदिल शेख हिने एसएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ८८ टक्के गुण मिळवून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. तिचे या यशामुळे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. माहिनूर शेख हिने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शहरातील नामांकित पी ए इनामदार इंग्लिश स्कूल येथे पूर्ण केले. शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर माहिनूरने हे यश मिळविले असल्याची भावना व्यक्त केली. अभ्यासात सातत्य, वेळेचे योग्य नियोजन आणि आत्मविश्वास यांच्या बळावर माहिनूरने बोर्ड परीक्षेत ८८ टक्के गुण मिळवत कुटुंबाचे तसेच शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. माहिनूर ही ज्येष्ठ पत्रकार रियाज शेख यांची नात असून आदिल शेख यांची कन्या आहे. माहिनूर शेख हिचे शहरातील विविध मान्यवर, शिक्षक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच मित्रपरिवाराने तिचे अभिनंदन केले आहे.

## सय्यद यांना 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' जाहीर



**अहिल्यानगर :** समाजात माणुसकीचा संदेश देत गेल्या दोन दशकांपासून निस्वार्थपणे सामाजिक कार्य करणारे मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांना यंदाचा 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव होणार आहे. छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दि. १६ मे रोजी हे राज्यस्तरीय साहित्य संमेलन उत्साहात पार पडणार आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली. अल्ताफ सय्यद हे मागील २० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून, समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने काम करत आहेत. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या कार्याची मोठी दखल घेतली गेली होती. शरद पवार विचार मंचच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरजू कुटुंबांना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. कोरोना संकटाच्या पहिल्या लाटेपासून त्यांनी फ्रंटलाइन वर्कर्ससाठीही मोठे योगदान दिले. बुथ हॉस्पिटलला आवश्यक साहित्य पुरविणे, पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एनर्जी ड्रिंक, मास्क, सॅनिटायझर आदी साहित्य देऊन त्यांना सहकार्य करण्यात आले.

## शास्त्रज्ञ रणजित राऊत यांनी घेतली सिंधुदुर्गच्या मानद वन्यजीव संरक्षकांची भेट



**माहिजळगाव :** फक्राबाद, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील रहिवासी व सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई च्या प्राणीशास्त्र विभागाचे जैवविविधता संशोधक व युवा शास्त्रज्ञ रणजित रावसाहेब राऊत यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मानद वन्यजीव संरक्षक प्रा. नागेश दप्तरदार यांची नुकतीच भेट घेतली. या भेटीदरम्यान सागरी जैवविविधता संरक्षण, विशेषतः ऑलिव्ह रिडले कासवांच्या पिलांचे संरक्षण व संवर्धन या विषयांवर सखोल आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. किनारपट्टी भागात आढळणाऱ्या ऑलिव्ह रिडले कासवांच्या अंडी उबविण्याच्या प्रक्रिया, पिलांचे सुरक्षित समुद्रात सोडणे, तसेच स्थानिक पातळीवर जनजागृती कशी वाढवावी याबाबत दोन्ही तज्ज्ञांनी विविध उपाययोजनांवर विचारमंथन केले. यासोबतच सागरी परिसंस्थेचे संतुलन राखण्यासाठी स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढविणे, स्वयंसेवी संस्थांची भूमिका आणि शाश्वत संवर्धनासाठी आवश्यक धोरणे यावरही चर्चा झाली. प्रा. दप्तरदार यांनी सिंधुदुर्ग किनारपट्टीवरील जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित करताना, योग्य नियोजन आणि लोकसहभागातून कासव संवर्धन अधिक प्रभावीपणे राबवता येईल, असे मत व्यक्त केले. तर रणजित राऊत यांनी ग्रामीण व किनारी भागात प्रत्यक्ष काम करताना आलेले अनुभव मांडले आणि संवर्धनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज स्पष्ट केली. ही भेट सागरी जैवविविधता संरक्षणासाठी एक सकारात्मक पाऊल मानली जात असून, भविष्यात संयुक्त उपक्रम राबवण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

## ज्ञानसाधना गुरुकुलचा शंभर टक्के निकाल



**अहिल्यानगर :** ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था, केडगाव संचलित ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेस यांनी यंदाही दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये कु. दिया कुलट हिने ९५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रथमेश गारुडकर याने ९१ टक्के गुणांसह द्वितीय तर प्रीती रासकर हिने ९०.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय हर्षदा दळवी (९०.४०%), अक्षरा पानसंबळ (९०%), आदित्य शिर्के (९०%), अदिती कोठावळे (९०%), आयुष राऊत (८९%), दिव्या रोकडे (८८%), साक्षी कसबे (८६%), श्रावणी कोळी (८६%), आकांक्षा चिपाडे (८५%), वर्षा शिंदे (८४%), रुचिका पाटोळे (८४%), अनुष्का राऊत (८३%), संस्कृती गावडे (८२%), अर्पिता टिमकरे (८२%), श्रेयस शेलार (८२%), शार्दुल धामणे (८२%), सिद्धांत नरवडे (८२%), अक्षरा घोडके (८१%), रुद्र गाडीलकर (८१%), श्रेयस शिंगोटे (८१%), सार्थक देवकर (८०%), कृष्णा देशमुख (८०%), अमृता येळकर (८०%), श्रावणी मतकर (८०%), सर्वेश अंधारे (८०%), हर्ष मोहीम (८०%) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा ज्ञानसाधना गुरुकुल तसेच केडगाव ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक प्रसाद जमदाडे म्हणाले की, ज्ञानसाधना गुरुकुलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही मुलीनेच प्रथम क्रमांक पटकावला ही अभिमानाची बाब आहे. पालकांनी मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण द्यावे. 'लेक वाचवा, लेक शिकवा' हा संदेश समाजात रुजविणे आवश्यक आहे. यावेळी शिक्षिका प्रतीक्षा फुलारी, पूर्वा ढोरसकर व नक्षत्रा ढोरसकर उपस्थित होत्या.

# जामखेडच्या विकासकामांची आ. पवारांकडून पाहणी

## बसस्थानक, जिल्हा उपरुग्णालय, व्यापारी संकुल, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा घेतला आढावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** कर्जत-जामखेड मतदारसंघाचे आ. रोहित पवार यांनी आज जामखेडमध्ये सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाचे नवे कार्यालय, अत्याधुनिक एसटी स्थानक, व्यापारी संकुल, महसूल कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, जिल्हा उपरुग्णालय, जलशुद्धीकरण केंद्र तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा आढावा घेत त्यांनी विकासकामे दर्जेदार, गतिमान आणि लोकाभिमुख पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणीही त्यांनी जाणून घेतल्या.

जामखेडमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वतंत्र व प्रशस्त कार्यालय नसल्याने अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर उभारण्यात येत असलेल्या नव्या विभागीय कार्यालयाच्या कामाची आ. रोहित पवार यांनी पाहणी केली. कामाची गुणवत्ता कायम राखत ते वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर जामखेडमधील नव्या सुसज्ज एसटी स्थानक व शॉपिंग सेंटरच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांसाठी एसटी ही आजही सर्वात महत्त्वाची आणि परवडणारी वाहतूक सेवा असल्याचे सांगत प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी प्रशासन आणि ठेकेदारांना सूचना केल्या. यावेळी त्यांनी प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि अपेक्षाही जाणून घेतल्या.

युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने सुमारे ११.५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या १५० गाळ्यांच्या व्यापारी संकुलाच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. तसेच महसूल कर्मचाऱ्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या निवासस्थानांच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. निवासस्थाने पूर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांची राहण्याची अडचण दूर होऊन त्यांना रोज दूरवरून प्रवास करण्याची गरज भासणार नसल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी जिल्हा उपरुग्णालयाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करत त्यांनी आरोग्य सुविधांबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

तसेच जामखेड शहराला शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने लेहणेवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून तेथील अडचणींचाही त्यांनी आढावा घेतला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर आणि उद्योजक बापूसाहेब कार्ले यांच्या पुढाकारातून आयोजित रोजगार मेळाव्यालाही आ. रोहित पवार यांनी भेट दिली. या मेळाव्यात दहावीपासून पदवीधर युवकांना चाकण येथील नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. निवड झालेल्या युवकांचे अभिनंदन करत त्यांनी आयोजक आणि कंपनी प्रतिनिधींचा सन्मान केला. राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंदर्भात बोलताना आ. रोहित पवार यांनी विरोधकांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले. विकासकामांमध्ये राजकारण न करता जनहिताला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दौऱ्यादरम्यान आ. रोहित पवार यांनी नागरिकांच्या भेटीगाठी घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी राजेंद्र कोठारी, अमोल राळेभात, शहाजी राळेभात, रमेश आजबे, वैजिनाथ पोले, सागर कोल्हे, लक्ष्मण ढेपे, नगरसेवक राजेंद्र गोरे, नगरसेवक वसीम सय्यद, प्रशांत राळेभात, कुंडल राळेभात, संदीप गायकवाड, हरीभाऊ आजबे, दादा उगले, बजरंग डुचे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात उष्मालाटेचा 'यलो अलर्ट'

**अहिल्यानगर :** भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १२ ते १४ मे २०२६ दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे. प्रशासनाने नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**नागरिकांनी काय करावे?**

तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे, तसेच घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करावा, घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा, तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हापासून बचाव करण्यासाठी हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा व थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टी.व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करावा.

**काय करू नये ?**

दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा. उन्हात अतिकष्टाचे कामे करू नका. बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. दारु, चहा, कॉफी व कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका. उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या कालावधीत शक्यतो स्वयंपाक करण्याचे टाळावे व मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात. उष्माघाताची लक्षणे दिसताच सर्व नागरिकांनी तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती जाहिरातीस मुदतवाढ द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** संच मान्यता कनिष्ठ महाविद्यालयांची उपलब्धता अद्यापही प्रलंबित असल्याने पवित्र पोर्टलमार्फत होणाऱ्या शिक्षक भरतीच्या जाहिरातीस मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी वर्षाताई गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन त्यांच्या मार्फत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच शिक्षण आयुक्तांकडे पाठविण्यात आले आहे.

यावेळी शिक्षक परिषदेचे कोषाध्यक्ष बबन शिंदे, सुनिल दानवे, संजय पालवे, अशोक पवार, रावसाहेब गाणखेर, सुरेश सरोटे, मच्छिंद्र ढाकणे, एम. एस. साखरे, ए. पी. क्षीरसागर, जी. एम. शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संच मान्यतेतील रिक्त पदांच्या आधारे पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. मात्र, माध्यमिक विभागाशी संलग्न असलेल्या अनेक कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता अद्याप प्रलंबित असल्यामुळे संबंधित शाळांमध्ये रोस्टर तपासणी आणि रिक्त शिक्षक पदांची जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी भरती प्रक्रियेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

शिक्षक परिषदेने शासनाकडे मागणी करताना स्पष्ट केले की, कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता उपलब्ध झाल्यानंतरच भरती जाहिरातीची अंतिम मुदत निश्चित करण्यात यावी. तसेच राज्यातील बहुसंख्य शिक्षकांची जन्मतारीख १ जून असल्याने दरवर्षी ३० जून रोजी मोठ्या प्रमाणावर शिक्षक सेवानिवृत्त होतात. त्यामुळे अनेक विद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर शिक्षक परिषदेने शासनाला विनंती केली आहे की, पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रियेसाठी ३१ मे २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या जागांचा विचार करण्याऐवजी ३० जून २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या पदांचा आधार घ्यावा. त्यानुसार भरती जाहिरातीस मुदतवाढ देऊन सर्व रिक्त पदांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गुलमोहर रोडवर तरुणावर चाकूने हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** कॉलेजमध्ये झालेल्या किरकोळ भांडणाचे रूपांतर टोकाच्या वादात होऊन एका १९ वर्षीय विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. ही घटना गुलमोहर रोडवरील आनंद शाळेसमोर घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक सोमनाथ लांडगे या विद्यार्थ्याने याप्रकरणी तक्रार दिली आहे. अभिषेक हा एका औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयात शिक्षण घेतो. त्याचा मित्र संतोष महाडिक आणि आरोपी विशाल नागरगोजे यांच्यात कॉलेजमध्ये दुपारी भांडण झाले होते. याच वादाचा राग मनात धरून मुख्य आरोपी अविनाश विश्वास जायभाय याने संतोषला फोनवरून शिवीगाळ केली आणि चर्चेसाठी बोलावले. सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास अभिषेक, संतोष आणि रोहन लांडगे हे नाथकृपा इंटरप्राईजेस कार्यालयाबाहेर आले असता, तिथे अविनाश जायभाय आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. यावेळी झालेल्या झटापटीत अविनाशने अभिषेकला संतोष समजून त्याच्यावर चाकूने वार केले. अभिषेकच्या डाव्या पायाच्या मांडीवर चार ठिकाणी जखमा झाल्या आहेत. हल्ल्यानंतर आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. जखमी अभिषेकवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी अविनाश जायभाय व त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस कर्मचारी प्रियंका राऊत करत आहेत.

# २६ हजारांचे पत्रे लंपास ; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील काटवण खंडोबा परिसरातील विठाई लॉनसमोर सुरू असलेल्या शेडच्या कामासाठी आणलेले २६ हजार ६०० रुपये किमतीचे लोखंडी पत्रे अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अमोल काशिनाथ गाडळकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी अमोल गाडळकर हे विठाई लॉन चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सध्या लॉनच्या समोर शेडचे काम सुरू असल्याने त्यांनी सुयोग पत्रा डेपो येथून विविध आकाराचे ८८ पत्रे आणून ठेवले होते. पहाटेच्या सुमारास काम संपवून घरी जाताना सर्व पत्रे जागेवरच होती. मात्र, सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास कामगार कामावर आले असता त्यांना पत्रे कमी असल्याचे दिसून आले. गाडळकर यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता, १३ फूट लांबीचे एकूण १४ पत्रे चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. परिसरात सर्वत्र शोध घेऊनही पत्रे मिळून न आल्याने त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेतली. चोरीस गेलेल्या एका पत्र्याची किंमत १९०० रुपये आहे. कोतवाली पोलिसांनी याप्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शरद वाघ करीत आहेत. शहरातील वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.



# संविधान मूल्यांच्या प्रसारासाठी कांबळे यांचा मुंबईत गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगरचे संरक्षण सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते विजय लक्ष्मण कांबळे यांना मुंबई येथे आयोजित भव्य सोहळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या गौरवामुळे भिंगार व अहिल्यानगर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई येथे झालेल्या या विशेष पुरस्कार सोहळ्यात अक्षयजी आंबेडकर व नंदेश विठ्ठल उमाप यांच्या हस्ते विजय कांबळे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आशादीप महिला आधार मंच संलग्न 'लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्य' यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसेवेसाठी कार्यरत असलेल्या व्यक्ती व संस्थांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

विजय कांबळे यांनी भिंगार व अहिल्यानगर परिसरात सामाजिक बांधिलकी जपत अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. समाजातील वंचित, गरजू व दुर्लक्षित घटकांसाठी सातत्याने कार्य करत त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, युवकांमध्ये संविधान जागरूकता निर्माण करणे तसेच सामाजिक ऐक्य आणि बंधुता वृद्धिंगत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती मोहिमा राबवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. संविधान मूल्यांचा प्रसार आणि समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, बौद्धाचार्य लक्ष्मण माघाडे, तसेच विविध संघटनांकडून विजय कांबळे यांचे अभिनंदन होत आहे.

# अहिल्यानगरमध्ये भोंदूबाबाला अखेर अटक

## गुप्तधन काढून देण्याच्या नावाखाली महिलेची फसवणूक ; सर्जेपुरातील घटना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर शहरात अंधश्रद्धेच्या नावाखाली मोठी फसवणूक उघडकीस आली आहे. घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या आमिषाने एका भोंदूबाबाने महिलेकडून ५० हजार रुपये घेवून जादूटोणा, अघोरी विद्या केल्याचे दाखवत गुप्तधनही काढून न देता घेतलेले पैसेही परत दिले नाही. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या भोंदू बाबाला पोलिसांनी अटक केली आहे. शिव अण्णासाहेब सोनवणे (रा. रंगभवन जवळ, सर्जेपुरा) असे या भोंदूबाबाचे नाव आहे. याबाबत सोनाली महेश काळोखे (रा. रंगभवन जवळ, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे.

या बाबत पोलिस सुत्राकंडून समजलेली माहीती अशी की, फिर्यादी यांच्या घराजवळच राहणारा भोंदूबाबा शिव सोनवणे याने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाला तुमच्या घराखाली मोठ्या प्रमाणात सोन्याचे गुप्तधन आहे. ते जादूटोणा आणि अघोरी विद्या करून काढून देतो असे आमिष दाखवले. त्यासाठी त्यांच्याकडून ५० हजार रुपये रोख स्वरुपात घेतले. या भोंदूबाबाच्या भूलथापांना बळी पडून फिर्यादीच्या कुटुंबीयांनी घर पाडले. त्यानंतर या भोदू बाबाने त्या जागेत लिंबू, मानवी कवटी, हाडे, हळद, कुंकू, भस्म अशी पूजा मांडून मोठमोठ्याने मंत्र उच्चारून अघोरी विधी केला. परंतु कुठलेही गुप्तधन मिळवून न देता आणि घेतलेले ५० हजार रुपये न देता फसवणूक केली. तसेच आता ही जागा माझी आहे. तुम्ही जर माझ्या नादाला लागले तर तुमच्यावर अघोरी प्रयोग करून तुम्हाला संपवून टाकील अशी धमकी दिली आहे.

**जागा बळकावण्यासाठी भोंदूबाबाकडून बेदम मारहाण**

दरम्यान भोंदू बाबा शिव सोनवणे याने गुप्तधनाच्या आमिषाने काळोखे कुटुंबाला घर पाडायला लावले. त्यांची आर्थिक फसवणूक केली. तसेच जागा बळकावण्यासाठी कुटुंबीयांना ११ मे रोजी रात्री १०.३० च्या सुमारास लाथाबुक्क्यांनी आणि कुऱ्हाडीच्या दांड्याने बेदम मारहाणही केली आहे. या मारहाण प्रकरणी आणखी एक गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महेश भास्कर काळोखे (वय २९, रा. रंगभवन, सर्जे पुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात शिव अण्णासाहेब सोनवणे, ओम अण्णासाहेब सोनवणे, कोहिनूर अण्णासाहेब सोनवणे (सर्व रा. सर्जेपुरा) आणि यश सागर सोळशे (रा. बोल्हेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिव बाबा सोनवणे आणि इतर आरोपींनी फिर्यादी महेश काळोखे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेला भाऊ दीपक आणि आई लक्ष्मी यांनाही आरोपींनी कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करून जखमी केले. तसेच त्यांच्या दुचाकीचेही नुकसान करून जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादी वरून शिव सोनवणे सह चौघांवर मारहाणीचा व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी भोंदूबाबा शिव अण्णासाहेब सोनवणे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३५१ (२) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ आणि गुन्हे शोध पथकाने भोंदूबाबा शिव सोनवणे याला तात्काळ अटक केली आहे.


## पाथर्डी नगरपरिषद पाथर्डी

### जाहिर निवीदा (टेंडर) सूचना

### सन २०२६-२७

**कामाचे नाव :-** सर्वसाधारण नगरपरिषद निधी अंतर्गत पाथर्डी नगरपरिषद हददीत २ विकास कामे करणे.

१) पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील ओपन थेटर येथील शौचालय दुरुस्ती करणे.

२) पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील ओपन थेटर येथे फरशी बसविने व प्लंबिंग करणे.

* निवीदा फॉर्म विक्री दि. १४/०५/२०२६ ते दि. २०/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागात उपलब्ध राहतील.

* निवीदा जमा करण्याची तारीख दि. २१/०५/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत, निवीदा उघडण्याची तारीख दि.२२/०५/२०२६ राहिल.

* निवीदा संबंधी सर्व अटी व शर्ती निवीदा संचा सोबत उपलब्ध राहील.

शिक्का

सही/-

(संतोष लांडगे)

मुख्याधिकारी

पाथर्डी नगरपरिषद पाथर्डी

द•ख•ल

## हंगाम सन २०२५ राज्यस्तरीय पिकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते

**पुणे :** राज्यात खरीप हंगाम सन २०२५ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या ११ पिकांसाठी राज्य पातळीवरील पीकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते झाले असल्याचे संजय काचोळे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी पुणे यांनी कळविले आहे. ज्या शेतकऱ्यांची स्पर्धे त भाग घेतलेल्या पिकाची उत्पादकता तालुक्याच्या त्या पिकाच्या सरासरी उत्पादकतेच्या (त्या पिकाची मागील पाच वर्षांचे सरासरी उत्पादकता) दीडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांना पीक स्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येते. सन २०२५-२६ राज्यस्तरीय पिक स्पर्धेत पिकनिहाय पुढील तालुक्यातील शेतकरी विजेते झाले आहेत. सोयाबीन आदिवासी गट प्रथम क्रमांक भाउ तुळशिराम वारे, ओतुर ता. जुन्नर, द्वितीय क्रमांक रामचंद्र विठोबा कातवारे, आलमे ता. जुन्नर, तृतीय क्रमांकअशोक राघु नाईकरे, कमान ता. खेड. सुर्यफुल सर्वसाधारण गटात प्रथम क्रमांक नारायण बाब लोणकर, कऱ्हाटी ता. बारामती, पांडुरंग मारुती वाबळे, जळगाव कप ता. बारामती. भात आदिवासी गट प्रथम क्रमांक लक्ष्मण डोंगरु लोहकरे, मापोली ता. आंबेगाव, रामचंद्र चाहू कारोटे, दिगद ता. आंबेगाव. बाजरी सर्वसाधारण गटात तृतीय क्रमांक रायचंद बाबुराव शिंदे, विठ्ठलवाडी ता. शिरुर.पीक स्पर्धेसाठी तालुका हा घटक आधारभूत धरण्यात येतो. शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, जिल्हा व तालुकास्तरावरील बक्षीस देण्यात येतात. सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी बक्षीसाचे स्वरुप राज्य स्तरावर पहिले बक्षीस रु. ५० हजार, दुसरे बक्षीस ४० हजार व तिसरे बक्षीस रु. ३० हजार. खरीप हंगाम सन २०२५ पिक स्पर्धेचे राज्यस्तरीय निकाल आयुक्त कृषी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय पीक स्पर्धा निकाल समितीद्वरे दिनांक ८ मे २०२६रोजी जाहीर करण्यात आला.

## आधार केंद्राची वेळ रात्री ८ पर्यंत

**पुणे :** नागरिकाभिमुख सेवांना प्राधान्य देत भारतीय टपाल विभागाने पुणे प्रधान डाकघर, साधू वासवानी चौक येथील आधार सुविधा केंद्राच्या कामकाजाच्या वेळेत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता हे केंद्र सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत कार्यरत राहणार आहे. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेक नागरिकांना कार्यालयीन वेळेमुळे आधार सेवा घेण्यात अडचणी येत होत्या. कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच नोकरी करणाऱ्या नागरिकांच्या सोयीचा विचार करून ही विस्तारित वेळ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे आधार नोंदणी, मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, पत्ता बदल, बायोमेट्रिक अपडेट, जन्मतारीख दुरुस्ती आदी सेवा अधिक सोयीस्करपणे उपलब्ध होणार आहेत. भारतीय टपाल विभागाने नेहमीच नागरिकाभिमुख सेवांवर भर दिला असून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिकापर्यंत विश्वासार्ह व पारदर्शक सेवा पोहोचविण्याचे कार्य सातत्याने केले आहे. टपाल विभाग केवळ पत्रव्यवहारापुरता मर्यादित न राहता आता आधार सेवा, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक, बचत योजना, विमा सेवा, पार्सल सेवा आणि ई-कॉमर्स वितरण अशा विविध आधुनिक सेवांद्वरे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे.

## प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करा-मंत्री अतुल सावे

**पुणे :** राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सौर सयंत्र प्राधान्याने पूर्ण करावे तसेच प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करावेत. याशिवाय सामाजिक उत्तर दायित्व निधीद्वरे सौर प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा महाऊर्जाचे अध्यक्ष अतुल सावे यांनी दिले. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) नियामक मंडळाची १०८ वी तसेच ३१ वी



वार्षिक सर्वसाधारण बैठक आज पुणे येथील महाऊर्जा भवन येते पार पडली. यावेळी राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महाऊर्जा महासंचालक ओमप्रकाश बकोरिया, अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर व सर्व विभागांचे महाव्यवस्थापक , उपसंचालक लेखा व इतर अधिकारी उपस्थित होते.


श्री. सावे यांनी पीएम कुसुम योजनेमधील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कॉल सेंटर सुरू करावे. सध्याच्या इंधन टंचाईवर मात करण्यासाठी विभागाच्या सर्व इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची सूचना दिल्या. यावेळी महाऊर्जा कार्यालयात नव्याने नियुक्त झालेल्या प्रकल्प अधिकारी व लेखापाल यांना मंत्री श्री. सावे व श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी 'पुणे ॲग्री हॅकेथॉन-२०२६' स्पर्धेचा लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**पुणे :** पुणे ॲग्री हॅकेथॉन-२०२६' या स्पर्धेचे कृषी महाविद्यालय येथे १५ ते १७ मे २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात येणार असून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते पुणे ॲग्री हॅकॅथॉन-२०२६' या स्पर्धेचे १५ मे रोजी सकाळी ११.३० वाजता कृषी महाविद्यालय येथे उद्घाटन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत मृदा आरोग्य आणि व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन आणि ऑटोमेशन, शेती यांत्रिकीकरण (एआय आणि रोबोटिक्स), कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी, अक्षय ऊर्जा आणि कृषी-कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कीड व्यवस्थापन, हवामान-अनुकूल आणि डिजिटल शेती, प्रभावी कृषी प्रशासनासाठी एआय, तंत्रज्ञान आधारित हस्तक्षेप प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पीक नुकसानीचे मूल्यांकन आणि भाकितासाठी एआय, तंत्रज्ञान, साधने या विषयाशी निगडित नवकल्पना, उत्पादने असणार आहे.

# बोगस बियाणे विक्री रोखण्यासाठी भरारी पथके तैनात

## पुरंदरच्या खरीप नियोजनासाठी तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण सज्ज




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**'सासवड :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना बियाणे, खते वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. पंचायत समिती सभागृह, सासवड येथे आमदार विजयबापू शिवतारे यांच्या अध्यक्षतेखाली 'खरीप आढावा सभा' नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत कृषी विभागाला नियोजनाबाबत कडक सूचना देतानाच, पावसाचा अंदाज पाहूनच शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

आगामी खरीप हंगामासाठी पुरंदर

### बियाणे, खतांची टंचाई भासणार नाही याची श्रीधर चव्हाण यांनी दिली ग्वाही

### सासवड येथे पार पडली 'खरीप आढावा सभा'

हवेली विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयबापू शिवतारे यांनी कृषी विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आढावा घेतला. या सभेत कृषी विभागाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार, यंदा तालुक्यासाठी भात (१४०० क्विंटल), सोयाबीन (१६०० क्विंटल), बाजरी (३१५ क्विंटल) आणि भुईमूग (२७०० क्विंटल) बियाण्यांची तर १३,४०२ मेट्रिक टन खतांची उपलब्धता नियोजित करण्यात आली आहे. एल निनोचे परिणाम आणि पावसाचा लहरीपणा लक्षात घेऊन आपत्कालीन पीक नियोजन आराखडा तयार ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. विशेषतः खाजगी विक्रेत्यांकडून बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी बियाण्यांची बॅग आणि त्यावरील टॅग जपून ठेवावेत, जेणेकरून भविष्यात फसवणूक झाल्यास तक्रार करणे सोपे होईल, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खालावत असल्याने 'नैसर्गिक शेती' ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शिवतारे यांनी केले. सभेतील प्रमुख मुद्दे आणि निर्णय: बोगस बियाणे विक्रीवर लगाम: बोगस बियाणे आणि खतांची जादा दराने विक्री रोखण्यासाठी विशेष 'भरारी पथके' तैनात करण्यात आली आहेत. पीक विमा जनजागृती: जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, यासाठी गाव पातळीवर व्यापक प्रचार प्रसिद्धी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना: या योजनेचा लाभ गरजू आणि अपंगत्व आलेल्या लाभार्थ्यांना मिळावा, यासाठी प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याचे आदेश दिले पेरणीपूर्व मार्गदर्शन: कृषी विभागाने प्रत्येक गावात जाऊन 'पेरणीपूर्व मार्गदर्शन' शिबिरे आयोजित करावीत, असेही ठरविण्यात आले.

**''यंदाचा खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. बोगस बियाणे विकून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.''**
**' विजयबापू शिवतारे,**
**आमदार, पुरंदर-हवेली**

**''यंदाच्या खरीप हंगामासाठी बियाणे आणि खतांचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. पुरंदर तालुक्यातील प्रत्येक गावात कृषी विभागामार्फत 'पेरणीपूर्व मार्गदर्शन' शिबिरे आयोजित केली जातील. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता, अधिकृत विक्रेत्यांकडूनच निविष्ठांची खरेदी करावी आणि पावसाचा अंदाज घेऊनच पेरणीचा निर्णय घ्यावा. बोगस विक्री करणाऱ्यांवर आमची भरारी पथके नजर ठेवून आहेत.''**
**' श्रीधर चव्हाण,**
**तालुका कृषी अधिकारी, पुरंदर.**

**उपस्थित मान्यवर:**
**या आढावा सभेला पंचायत समिती सभापती अमित झेंडे, उपसभापती प्रवीण जगताप, गट विकास अधिकारी श्रीमती प्रणोती श्रीश्रीमल, नायब तहसीलदार संदीप पाटील, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, विविध कृषी अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचा समारोप खरीप हंगाम यशस्वी करण्याच्या विश्वासाने करण्यात आला.**

## आळंदीच्या विकासासाठी आवश्यक निधी देणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने घेतली उपमुख्यमंत्री शिंदेची भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेल्या आळंदी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सकारात्मक असून आवश्यक त्या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.आळंदी नगरपरिषदेच्या विविध विकासकामांच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.यावेळी शहराच्या विकाससंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

आळंदी नगरपरिषदेच्या वतीने नवीन प्रशासकीय इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देणे, शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विकास आराखड्यास मंजुरी देणे, आधुनिक स्ट्रीटलाईट व्यवस्था उभारणे, शहर सुशोभीकरण तसेच विविध मूलभूत नागरी सुविधांसाठी



विशेष निधी देण्याची मागणी करण्यात आली. दरवर्षी लाखो भाविकांचे आगमन होत असल्याने आळंदीतील नागरी सुविधा अधिक सक्षम व दर्जेदार करण्याची गरज असल्याचे नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले. वाढती लोकसंख्या, भाविकांची संख्या आणि भविष्यातील विकास लक्षात घेता विशेष निधीची आवश्यकता असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित विकासकामांचे सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना दिल्या. आगामी काळात आळंदी शहरातील विविध विकासकामांना गती मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. या भेटीदरम्यान नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर, नगरसेवक दिनेश घुले, सोमनाथ कुऱ्हाडे, सुरेश झोंबाडे, रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, नगरसेविका ऋतुजा घुंडरे, पूजा घुंडरे, साक्षी कुऱ्हाडे, विजय तापकीर, दिपक काळे, चेतन कुऱ्हाडे, प्रसाद जगताप, संकेत कुऱ्हाडे तसेच शिवसेना शहरप्रमुख राहुल चव्हाण आदी उपस्थित होते.

## चाकसमान धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी समाधान शिबिर आयोजित करावे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** चाकसमान प्रकल्पग्रस्तांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी विशेष समाधान शिबिर आयोजित करावे. हे समाधान शिबिर प्रभावीपणे राबवून संबंधित विभागांनी त्याचे नेतृत्व करावे, तसेच शिबिराच्या माध्यमातून पुनर्वसनासाठी पात्र नागरिकांची कागदपत्रे तपासून त्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, असे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यातील चाकसमान धरणग्रस्तांच्या प्रलंबित पुनर्वसन प्रश्नासंदर्भात विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभाग संचालक भालचंद्र चव्हाण, सहसचिव पुनर्वसन विभाग संजय इंगळे, उपजिल्हाधिकारी पुनर्वसन पुणे स्वप्निल मोरे,चासकमान प्रकल्प पुनर्वसन समितीच्या वतीने अध्यक्ष बी.के. कदम, एल बी तनपुरे, आकाश बोंबले, बाळासाहेब दाते उपस्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यापूर्वी झालेल्या बैठकींचे अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे पुनर्वसन प्रक्रियेतील तांत्रिक बाबी आणि प्रलंबित मुद्द्यांची स्पष्टता होण्यास मदत होईल. मदत व पुनर्वसन विभागाने यापूर्वी झालेल्या बैठकींचा सविस्तर तपशील सादर करून, या संदर्भात कोणते धोरणात्मक निर्णय घेता येतील याबाबतचा अहवाल १२ जूनपर्यंत सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.

## तीव्र उष्णतेच्या लाटेचा नागरिकांना त्रास

### कामगार व नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना :जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** राज्य शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या हंगामी उष्णतेच्या इशाऱ्यानुसार पुढील काही महिन्यांत सामान्यापेक्षा अधिक तापमान राहणार असल्याचे अवगत केले आहे, अशा अत्यंत तीव्र उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीत सर्वाधिक कामगार आणि मजूरांना त्रास होतो , उष्णतेच्या लाटेच्या प्रतिकूल परिणामांपासून त्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने बहु-क्षेत्रीय उपाययोजना मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

**कामगार व उद्योग क्षेत्रासाठी :**
कामगारांचे कामाचे तास पुन्हा नियोजित करणे. विशेषतः दुपारच्या उष्णतेत काम टाळणे. आवश्यकतेनुसार कामाचा वेग कमी करण्याची परवानगी देणे, पुरेसे पिण्याचे पाणी, विश्रांती क्षेत्रे व थंडावा मिळेल अशी व्यवस्था करणे. आपत्कालीन बर्फ,पंखा व उष्णता प्रतिबंधक साहित्य उपलब्ध करुन देणे. आरोग्य विभागाशी समन्वय साधून कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

**कारखाने व खाणी व्यवस्थापनासाठी :**
कामगारांना सर्वाधिक उष्णतेच्या वेळेत विश्रांती देणे. दोन व्यक्तीच्या गटाने काम करण्याची व्यवस्था करणे. इलेक्ट्रोलाइट पूरक पेय उपलब्ध करुन देणे. कामगारांना उष्णतेच्या धोका व उपाययोनांबाबत जागरुक करणे.

**विशेष लक्ष देण्याचे गट :**
बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, रोजंदारी मजूर व असंघटीत क्षेत्रातील कामगाराच्या जनजागृतीसाठी पोस्टर, बॅनर व श्रमिक चौकांवर मोहिमा आयोजित करणे.

## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास 'अजितदादा पवार' नाव देण्यास मान्यता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई/ पुणे :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून नाविन्यपुर्ण अशा देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. देशी गायींच्या मौल्यवान व दुर्मिळ प्रजातींचे जतन, त्यांची दुग्धक्षमता वाढवणे तसेच शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे या महत्त्वाच्या बाबींवर या केंद्रामार्फत कार्य सुरू आहे. त्यांच्या पश्चात या केंद्रास त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याची व स्मृतीची जपणूक करण्यात आली असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या केंद्रास अजितदादा पवार यांचे नाव देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र असे नामकरण करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय (क्र. २०२६०५१३११३८२१२५०१) कृषी विभागाने जारी केला आहे.

देशी गायींचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन, सुधारणा आणि संशोधन करण्याच्या उद्देशाने पुणे येथील कृषी महाविद्यालयात देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. या केंद्राच्या बळकटीकरणालाही यापूर्वी शासनाने मान्यता दिली होती.

## गुणवत्तेच्या जोरावर शाहू हायस्कूलला 'कर्मवीर पारितोषिक'




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती येथील श्री छत्रपती शाहू हायस्कूल यांना रयत शिक्षण संस्था तर्फे दिले जाणारे मानाचे 'कर्मवीर पारितोषिक' ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा सन्मान देण्यात आला. मागील काही वर्षांच्या प्रवाहानुसार गुणवत्तावाढ, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणाऱ्या शाळांचा या पुरस्कारासाठी विचार केला जातो. या पार्श्वभूमीवर शाहू हायस्कूलने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात केलेली प्रगती उल्लेखनीय ठरली आहे. शैक्षणिक गुणवत्तावाढ, स्पर्धा परीक्षांमधील यश आणि विविध उपक्रमांतील सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर विद्यालयाने हा मान पटकावला. या यशामागे स्कूल कमिटीचे अध्यक्ष सदाशिव बापूजी सातव यांचे मार्गदर्शन तसेच प्राचार्य गणपत तावरे उपमुख्याध्यापक महादेव आगम पर्यवेक्षक परदेशी यांचे सक्षम नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. या सन्मानामुळे विद्यालयाच्या कार्याची व्यापक दखल घेतली गेली असून, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री


**मुंबई/ पुणे :** राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे. राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे. राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सुसज्ज शाळा इमारत आवश्यक : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षणासोबतच सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज वातावरण मिळणे ही काळाची गरज असून, त्यातूनच शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावतो, असे प्रतिपादन आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १, २ व ३ मधील इमारतींच्या दुरुस्ती व सुशोभीकरण विकासकामांचा शुभारंभ नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. नगरपरिषद शाळेच्या इमारतीचे आधुनिकीकरण, स्वच्छता व आवश्यक दुरुस्तीमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार असल्याचे नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी सांगितले. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, खुशी बोरुंदिया, पुजा घुंडरे, ऋतुजा घुंडरे, ऋतुजा तापकीर, नगरसेवक दिनेश घुले,



सुनिल घुंडरे, सागर कुऱ्हाडे, माजी सभापती श्रीधर कुऱ्हाडे यांच्यासह शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरपरिषदेकडून शहरातील शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात येत असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याचे शिक्षण समिती सभापती खुशी सागर बोरुंदिया यांनी सांगितले.

## भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करणार : मंत्री अतुल सावे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे, याच पार्श्वभूमीवर भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

श्री. सावे यांनी आज भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची पाहणी केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, अधीक्षक अभियंता बिपिन शिंदे, महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे, पीएमपीएल संचालक तथा नगरसेवक अजय खेडेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

श्री. सावे म्हणाले, क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती नागरिकांना व्हावी, याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत चर्चा करुन भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करुन कामाची सुरुवात करण्यात आली होती. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून स्मारकाचे काम वेगाने सुरू असून सध्याची ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी श्री. सावे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी श्री. नायर यांनी पुणे महानगरपालिकेच्यावतीने



भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक विकास आराखड्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांबाबत माहिती दिली. इमारतीची वैशिष्ट्ये आणि सुविधा: स्मारकामध्ये सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित विविध आधुनिक सुविधा असणार असून यामध्ये ऑडिओ-व्हिडिओ शो, दोन्ही महापुरुषांच्या जीवनचरित्रावर आधारित 'थीम बेस्ड' ऑडिओ-व्हिडिओ शो आणि होलोग्राफीचे काम करण्यात येणार आहे. या दोन्ही महापुरुषांचे अर्धपुतळे आणि त्यांच्या कार्याची माहिती प्रदर्शित केली जाणार आहे. मुली आणि महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र, मार्गदर्शन केंद्र आणि संगणक केंद्र उभारले जाणार आहे. स्मारकात एक ॲम्फीथिएटर देखील असणार आहे.

# कर्जत बसस्थानकाचे सिमेंट काँक्रिटीकरणाने रुपडे पालटले !

## आ. रोहित पवारांनी निधी उपलब्ध केल्याने कर्जत-करांकडून समाधान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** सर्वसामान्य प्रवाशांसह एसटी चालकांची परवड देखील आता थांबली असून कर्जत बसस्थानक परिसराचे सिमेंट काँक्रीटीकरणाने भाग्य उजळले आहे. अनेक दिवसांपासून कर्जतकरांची मागणी आमदार रोहित पवार यांनी निधी उपलब्ध करीत पूर्ण केली. त्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.यापूर्वी सध्या रिमझिम पावसाने देखील कर्जतच्या बसस्थानकात चिखलाचे साम्राज्य पसरले जात होते. काँक्रीटीकरणाने आता बसस्थानक परिसर चकाचक झाला आहे.

कर्जत बसस्थानकात साधा पाऊस पडला तरी जिकडे-तिकडे चिखलाचे साम्राज्य पसरले जात होते. या चिखलाने बसस्थानक परिसर निसरडा बनत सर्वसामान्य प्रवाशांना चालणे देखील मुश्किल ठरत असे. दुचाकीवर कुटुंबांना सोडण्यासाठी आले असता अनेकदा या निसरड्या परिसरामुळे लहान-सहान अपघात देखील घडल्याचे उदाहरणे पहावयास मिळाली. पावसाळ्यात कर्जतचे




बसस्थानक अक्षरशः रग्बी खेळाचे मैदान भासत असे. त्यामुळे कर्जत बसस्थानक परिसराचे सुशोभीकरण होत काँक्रीटीकरणाची मागणी पुढे आली होती. या प्रश्नांकडे आ. रोहित पवार यांनी लक्ष देत आपल्या आमदार विकास निधीतून मंजुरी घेत काँक्रीटीकरणाचे काम हाती घेत ते प्रगतीपथाने पूर्णत्वास नेले आहे. तीन आठवड्यात कर्जत बसस्थानकाचा बहुतांश भागाचे सिमेंट काँक्रीटीकरण पूर्ण झाल्याने परिसराचे रुपडे बदलले आहे. उन्हाळ्यात धुळीचे लोट तर पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य आता दूर झाले असून संपूर्ण बसस्थानक परिसर सिमेंट काँक्रीटीकरणाने चकाचक झाल्याने सर्वसामान्य प्रवाशांसह एसटी चालक-वाहक यांची परवड देखील थांबली असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

**बसस्थानक परिसरातील भिंतींवर पर्यावरण संवर्धन संदेश !**

मागील पाच वर्षांपासून वृक्षसंवर्धन आणि जतन कार्यात कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनेने आपले नाव कोरले आहे. बसस्थानक परिसरातील कचऱ्याचे निर्मूलन करीत त्यांनी भिंतीची स्वच्छता मोहीम हाती घेतली. यात लोक सहभाग घेत भिंतींना आकर्षक रंगवत त्यावर पर्यावरण संवर्धन संदेश रेखाटत परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन श्रमप्रेमींनी कर्जतकरांसह प्रवाशांना केले.

# जनतेचा आणि कार्यकर्त्यांच्या कष्टाचा विजय : आ. कर्डिले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** हा विजय माझा नसून राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील जनतेचा आणि कार्यकर्त्यांच्या कष्टाचा हा विजय आहे. असे प्रतिपादन नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांनी केले. दिवंगत आ. शिवाजीराव कर्डिले यांनी दाखवलेल्या मार्गावर चालून मी पाथर्डी तालुक्यातील प्रत्येक गावातील प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देईल. लवकरच संपूर्ण मतदारसंघाचा आभार दौरा आयोजित करून मी जनतेचे प्रत्यक्ष आभार मानणार आहे. असेही आ. कर्डिले यांनी यावेळी स्पष्ट केले. सत्काराला उत्तर देताना आ. कर्डिले भाऊक झाले होते.

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळवल्यानंतर,



पाथर्डी तालुक्यातील शिराळ ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी संपूर्ण गाव कर्डिले यांच्या विजयाने जल्लोषात न्हाऊन निघाले होते.

सत्कार सोहळ्यादरम्यान शिराळ ग्रामस्थांनी दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, शिवाजीराव कर्डिले यांचे शिराळ गावावर विशेष प्रेम होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात गावात अनेक विकासकामे मार्गी लावली. केवळ विकासकामेच नव्हे, तर कार्यकर्त्यांशी असलेली त्यांची नाळ घट्ट होती.

विशेषतः शिराळचे सुपुत्र वैभव खलाटे यांना थेट बाजार समितीचे संचालक पद देऊन त्यांनी निष्ठावंत कार्यकर्त्याचा सन्मान केला होता.

हीच कृतज्ञता शिराळच्या ग्रामस्थांच्या मनात आजही कायम असून, कर्डिले परिवारावर ग्रामस्थांचे विशेष प्रेम असल्याचे यावेळी आवर्जून नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी मार्केट कमिटीचे संचालक वैभव खलाटे, माजी चेअरमन हनुमंतराव घोरपडे, पै. मिठू मुळे, चेअरमन आदिनाथ आव्हाड, शरद मुळे, कुंडलिक नाना गोरे, गणेश गोरे, गोरक्ष तागड, माजी उपसरपंच अमोल घोरपडे, दत्तात्रय गोरे, बद्रीनाथ मुळे, कचरू तुपे, बाळासाहेब वाघ, प्रवीण वाघ, भाऊसाहेब गोरे, रवींद्र घोरपडे, प्रकाश मेजर घोरपडे, बापू तात्या गोरे, संभाजी गोरे, सचिन वाघ, ज्येष्ठ मार्गदर्शक जाधव भाऊसाहेब, भारत तागड, रावसाहेब तागड, रघुनाथ तागड, राम पुरी, महादेव कराळे, अवधूत दारकुंडे, बाबासाहेब गोरे यांच्यासह शिराळचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.विजयाचा जल्लोष आणि विकासाच्या निर्धाराने हा सत्कार सोहळा पार पडला.

# पत्रकार संघाचे राज्य संघटक भोकरे यांना झेड सुरक्षा द्यावी : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र सांगली पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत हा हल्ला होण्याअगोदर आरोपींना ताब्यात घेतले आहे. एका जमीनीच्या प्रकरणावरुन हा वाद निर्माण झाला असून या पाठीमागे फार मोठे षडयंत्र असून भोकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी झेड दर्जाची सुरक्षा देऊन यापाठीमागील मुख्य आरोपीला तत्काळ अटक करुण कठोर कारवाई करावी अशी मागणी पारनेर तालुका पत्रकार संघ, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ, पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून केली आहे.

पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी दि.१३ मे रोजी पत्रकार संघ पदाधिकारी व सदस्य यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी या जिवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपींचा निषेध करण्यात आला.

भोकरे यांच्यावर हल्ला करण्यापूर्वी संबंधित आरोपींना अटक करणाऱ्या सांगली जिल्हा पोलिस प्रमुख व वरिष्ठ अधिकारी यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले. मात्र हा हल्याचा पुर्व नियोजीत कट करणारा हा पडद्यामागचा आरोपी हा मोठा नेता असू शकतो. हा प्लॅन ए प्रमाणे प्लॅन बी सुध्दा त्यांच्याकडे तयार असू शकतो याची दखल माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने घेऊन संजय भोकरे यांना झेड दर्जाची सुरक्षा देऊन या हल्लेखोरांना तत्काळ अटक करण्याची मागणी पारनेर तालुका पत्रकार संघ, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ तसेच पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

# वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर मनसे आक्रमक

## उड्डाणपुलासह सिग्नलची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सुपा :** नगर-पुणे महामार्गावरील सुपा येथे दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले आहेत.



या कोंडीचा कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पारनेर तालुक्याच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उड्डाणपूल व पर्यायी मार्गाची मागणी करण्यात आली आहे

मनसे तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्या-नगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सुपा येथील शासकीय विश्रामगृह ते सुपा औद्योगिक वसाहत या दरम्यान महामार्गावर दररोज वाहतुकीची कोंडी होते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह रुग्णवाहिकांनाही तासन्तास खोळंबून राहावे लागते. इमर्जन्सीच्या वेळी याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. तसेच महामार्गावरील वाहतूक टाळण्यासाठी अनेक वाहने गावातील छोट्या रस्त्यांवरून जातात. त्यामुळे लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.या पार्श्वभूमीवर मनसेने दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत: १. शासकीय विश्रामगृह ते सुपा चखऊ पर्यंत उड्डाणपूल किंवा पर्यायी मार्ग तातडीने करण्यात यावा. २. सुपा चौकात सर्कल व सिग्नल यंत्रणा बसवून शाळकरी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेची व्यवस्था करावीनागरिकांच्या जीवाशी खेळ होत असताना प्रशासनाने डोळेझाक करू नये. तातडीने कार्यवाही न झाल्यास मनसे स्टाईलने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी दिला आहे यावेळी सुपा शहर अध्यक्ष अक्षय सुर्यवंशी, शाखा अध्यक्ष रमेश साबळे, पारनेर शहर अध्यक्ष सतिश म्हस्के, तालुका सचिव नारायण नरवडे, तालुका उपाध्यक्ष विरेंद्र थोरात यांच्या सह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# कृषिकन्यांचे लिंपणगावला स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी अंतर्गत साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव येथील बी.एस्सी.(कृषी) शाखेच्या अंतर्गत कृषिकन्या यांनी लिंपणगाव येथे ग्राम संलग्नतेचा परिचय कार्यक्रम आयोजित केला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर कृषिकन्या यांनी कार्यक्रमाचा उद्देश व आगामी उपक्रमांची सविस्तर माहिती गावकऱ्यांना दिली.

कृषिकन्या यांनी सांगितले की, लिंपणगावातील शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शेती माहिती, तसेच आधुनिक शेती पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये कृषी मेळावा, पाककला स्पर्धा, तसेच कृषी विषयांतील १० विविध विषयांवर प्रात्यक्षिके आयोजित केली जाणार आहेत. यासोबतच कृषी क्षेत्रातील नवीन मोबाईल ॲप्सची माहिती देखील गावकऱ्यांना देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे लिंपणगावातील



शेतकऱ्यांना शेतीविषयक अद्ययावत माहिती मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास कृषिकन्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व शेतकरी यांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे कौतुक केले व त्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच गावामध्ये कृषी जनजागृती व प्रात्यक्षिके आयोजित करणार असल्याचे आश्वासन सहाय्यक प्राध्यापक व कार्यक्रम समन्वयक, श्री एस. एस. चव्हाण यांनी दिले.

या कार्यक्रमासाठी श्री दत्तकृपा शैक्षणिक व कृषि ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे व सचिव सौ. अर्चनाताई पानसरे, रजिस्टर कल्याण शिंदे सर, प्राचार्य डॉ. के. एच. निंबाळकर सर, कार्यक्रम अधिकारी एस.एस बंडगर मॅडम यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या कार्यक्रमास ग्रामविकास अधिकारी धायगुडे, श्रीगोंदा खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रवीण कुरुमकर, ग्रामपंचायतचे प्रशासक पाटील, प्रदीप कोकाटे, संग्राम ओहोळ, माजी सदस्य जालिंदर कुरुमकर , महा बीजेचे जिल्हा व्यवस्थापक सर्जेराव चव्हाण, अवधूत दत्तात्रय भोईटे, सिद्धार्थ ओहोळ, शिवाजी कुसाळकर, खासेराव पवार, संजय कुसळकर, शांताराम धोत्रे, महादेव जगताप, सतीश भगत, दिलीप रेवगे, संतोष कुरुमकर हे उपस्थित होते. साईकृपा कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्या कु.मसाळ श्रावणी दत्तू , कुलथे शांभवी गोपाळ,रांधवे शुक्रांजली संतोष,जाधव काजल हनुमंत,येडे पायल दादासो,थोरात मृणाली गणेश,वाघमोडे अहिल्या सोपान यांनी सहभाग घेतला. कृषिकन्या पायल येडे हिने आभार प्रदर्शन केले.

# सदृढ समाजासाठी पावले उचलावीत : देशमुख

## चिचोंडीत प्रबोधन व्याख्यान मालेची उत्साहात सुरवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चिचोंडी पाटील :** आमच्या बापजाद्यांनी आमच्यासाठी सदृढ समाज निर्माण करून ठेवला आहे . त्या बळावर आपली पिढी आरामात आयुष्य पार करत आहे . पण आम्हीही त्याच मार्गाने मार्गक्रमण करत पुढील पिढीसाठी काही तरी करणे आवश्यक आहे कि ज्यामुळे ते आपल्या पिढी विषयी नव्या पिढीने अभिमानाने सांगू शकतील, अशी अपेक्षा प्रसिद्ध व्याख्याते तथा निवृत्त सनदी अधिकारी इंद्रजीत देशमुख यांनी व्यक्त केली.

प्रबोधन मंच व स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय चिचोंडी पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने १२ मे ते १४ मे



आयोजित केलेल्या प्रबोधन व्याख्यानमालेतील 'माणूस समजून घेताना' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना देशमुख बोलत होते .

देशमुख पुढे म्हणाले, भवताल अस्वस्थ आहे . आमच्या लेकीबाळी सुरक्षित नाहीत. समाजमाध्यमाने मुलांच्या मनातील असुया , मद, मत्सर, द्वेष, तिरस्कार अशा वामभावना तीव्र झाल्या आहेत . अशावेळेस पालकांनी सावध होऊन मुलांना वेळीच पुस्तकांशी मैत्री करायला प्रवृत्त केले पाहिजे. 'माणूस समजून घेताना' या विषयावर बोलताना ते म्हणाले, माणसांमध्ये

**लाच मागून भिकारी झालो नाही**

माझे वडील दत्ताजीराव देशमुख दहा वर्ष आमदार होते .त्यांनी ७३ एकर जमीन व लग्नात आलेल्या हुंड्याची रक्कम रयत शिक्षण संस्थेला दान केली .मी सनदी अधिकारी झालो . ज्या बापाने एवढे मोठे दान केले त्यांचा मुलगा म्हणून मी एक रुपयाच्याही लाचेसाठी कधी भिकारी झालो नाही . सर्वच अधिकाऱ्यांनी अधिकारी म्हणून रहावे . लाच मागून भिकारी होऊ नये . असे यावेळी इंद्रजीत देशमुख म्हणाले.

कावळ्याच्या वृत्तीचे, बगळ्याच्या वृत्तीचे ' मोराच्या वृत्तीचे असे अनेक प्रकार आहेत. कावळ्याच्या वृत्तीची माणसं इतरांच्या भरलेल्या जखमा टोकरतात व इतरांना वेदना देतात. बगळ्याच्या वृत्तीची माणसं ध्यानस्थ दिसतात . परंतु त्यांचे लक्ष माशाची शिकार करण्याकडे असते . त्यांचे ध्यान स्वार्थी असते. याउलट मोरांच्या वृत्तीचे माणसं मात्र मोर जसा पाऊस आल्यानंतर नाचतो त्या पद्धतीने इतरांना आनंद झाला की आनंदीत होतात . इतरांच्या दुःखाला ते स्वतःचे दुःख मानतात. अशा माणसांची संख्या वाढली तर त्याचा समाजाला उपयोग होईल. माणसाने सत्ता, संपत्ती, अधिकाराचा गैरवापर करू नये. युवकांना उद्देशून देशमुख म्हणाले, निवडणुकीच्या आदल्या दिवशी गाव विकला जातो . त्यामध्ये आम्हीही सहभागी असतो यापेक्षा वाईट गोष्ट नाही . गावातील तरुणांनी व सजग नागरिकांनी जागरूक राहायला पाहिजे आणि गाव विकण्यापासून थांबवले पाहिजे . त्यासाठी विरोध करा, संघर्ष करा. चांगल्या समाज निर्मितीसाठी हा संघर्ष आवश्यक आहे.

यावेळी वक्तृत्व स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना देशमुख यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली .

संदिप मेहेत्रे यांनी स्वागत केले. कल्याण ठोंबरे यांनी प्रास्ताविक केले. नृसिंह विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश ठोंबरे व संदिप कोकाटे यांनी सुत्रसंचालन केले. तर आभार मारुती खडके यांनी मानले.

## द•ख•ल

### आधारच्या महाआरोग्य शिबिरास प्रतिसाद



**एरंडगाव :** शेवगाव येथील आधार मल्टिस्पेशलिटी हॉस्पिटलच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्त हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुशील कबाडी यांनी तालुक्यातील गरजू रुग्णांसाठी मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले. परिसरातील नागरिकांनी त्यास प्रतिसाद देत ८० रुग्णांनी तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेऊन मोफत औषधोपचाराचा लाभ घेतला. प्रारंभी गोरक्ष महाराज उदागे यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. शिबिरासाठी अहिल्यानगर येथील डॉ. ऋषिकेश पवार, डॉ. सागर घालमे, डॉ. सचिन पानसरे, तसेच स्पेशतिर्ट हॉस्पिटल डॉ. सुशील कबाडी यांनी सर्व रुग्णांची मोफत तपासणी करून औषधोपचार केले. याप्रसंगी शेवगावातील सामाजिक कार्यकर्ते डॉ. निरज लांडे पाटील, डॉ. कृष्णा देहाडराय, विखे पाटील फाउंडेशनच्या आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ, नगरसेवक साईनाथ आधाट, भाजपाचे ज्येष्ठ नेते अमोल सागडे, इरफान काझी यांनी शिबिरास भेट देऊन डॉ. कबाडी यांना स्तुत्य उपक्रमाबद्दल धन्यवाद दिले. बाळासाहेब देशपांडे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### डोंगरगण जमीन घोटाळा प्रकरण तापलं!



**अहिल्यानगर :** डोंगरगण येथील शेतजमिनीच्या खरेदीखतासाठी बोगस इसम उभा करून बनावट कागदपत्रांच्या आधारे व्यवहार करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे . याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात २२ एप्रिल रोजी तक्रार अर्ज दिला होता. मात्र १५ दिवस उलटूनही गुन्हा दाखल न झाल्याने संतप्त तक्रारदारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांची भेट घेत निवेदन सादर केले. कमल पद्माकर शिरसाट, स्नेहा नरेंद्र शिरसाट, राजेंद्र शिरसाट आणि सागर शिंदे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,. मनोज भाऊसाहेब कराळे, राहुल प्रकाश मांढरे, जुनेक रफिक इनामदार, विनोद उबाळे तसेच भिमराव भाऊ चक्रनारायण या नावाने समोर आणलेल्या व्यक्तीच्या माध्यमातून संगनमताने हा प्रकार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे भिमराव भाऊ चक्रनारायण हे नावच बनावट असून मूळ आरोपीची खरी ओळख अद्याप समोर आलेली नाही. भाऊ नागोबा चक्रनारायण यांना भिमराव नावाचा मुलगा कधीच नव्हता. तरीही बनावट वारस उभा करून त्याच्या नावाची वारस नोंद महसूल अभिलेखात करण्यात आली. त्यानंतर त्याच आधारावर डोंगरगण येथील शेतजमिनीचे खरेदीखत करण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे संबंधित व्यक्तीने स्वतःचे वय ७५ वर्षे दाखवत शिरूर नगरपालिकेतून जन्म दाखला मिळवल्याचा आरोप आहे. जन्म दाखल्यावर नवजात बालकाचे नाव नसते; मात्र संबंधित दाखल्यात भिमराव हे नाव नंतर समाविष्ट करण्यात आल्याचे स्पष्ट दिसत आहे.

### श्रीगोंदा तहसील, पोलिस ठाण्यासह सर्वत्र घाणीचे साम्राज्य

**श्रीगोंदा :** राज्य सरकार एकीकडे स्वच्छता अभियानाचे ढोल बडवले जात आहेत, तर दुसरीकडे श्रीगोंदा शहरातील तहसील कार्यालय, श्रीगोंदा पोलीस ठाणे परिसर आणि इतर प्रशासकीय कार्यालयांच्या आवारात कचऱ्याचे ढीग, साचलेले पाणी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांमध्ये रोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी ये-जा करत असतात. मात्र, कार्यालय परिसरातच दुर्गंधी, उघड्यावर पडलेला कचरा आणि वाढलेली घाण यामुळे नागरिकांना अक्षरशः नाक मुठीत धरून वावरावे लागत आहे.स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, श्रीगोंदा नगर परिषद स्वच्छतेबाबत पूर्णपणे उदासीन झाली असून केवळ कागदोपत्री स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. शहर स्वच्छतेचे दावे मोठे, पण प्रत्यक्षात परिस्थिती भयानक, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे तहसील आणि पोलीस ठाण्यासारख्या संवेदनशील शासकीय परिसरातच अशी अवस्था असेल, तर शहरातील इतर भागांची काय स्थिती असेल, असा सवाल आता उपस्थित होत आहे.नागरिकांनी तात्काळ स्वच्छता मोहीम राबवून संबंधित परिसर स्वच्छ करण्याची मागणी केली असून, अन्यथा आंदोलनाचा इशाराही दिला आहे.स्वच्छ शहर ही घोषणा फलकापुरतीच की प्रत्यक्षातही दिसणार? असा सवाल आता श्रीगोंदेकर विचारू लागले आहेत. सरकार एकीकडे महिला आरक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करतेय मात्र श्रीगोंदयात महिलांसाठी सौचालय असूनही नसल्यासारखे आहे त्यामुळे सरकारने महिलांची कुचंबणा थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### प्रा. अशोक मोरे यांना पी.एच.डी प्रदान

**पारनेर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख अशोक विठ्ठल मोरे यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी



नुकतीच प्रदान केली आहे. जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या साहित्यिकांच्या कलाकृतींमधून समाजातील वंचित घटकांचे प्रश्न आणि वास्तव मांडल्याबद्दल त्यांना ही पदवी बहाल करण्यात आली. प्रा. मोरे यांनी अरविंद अडिगा आणि अमिताव घोष यांच्या निवडक साहित्यकृतींमधून प्रतिबिंबित होणारा वंचित वर्गाचा आवाज या विषयावर आपला शोधप्रबंध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सादर केला. साहित्यामध्ये केवळ कल्पनाविलास नसून ते समाजाचा आरसा असते. अरविंद अडिगा आणि अमिताव घोष यांसारख्या दिग्गज लेखकांनी आपल्या साहित्यातून समाजातील उपेक्षित, वंचित आणि कष्टकरी वर्गाचे जीवन ज्या प्रभावीपणे रेखाटले आहे, त्याचे सखोल विश्लेषण प्रा. मोरे यांनी आपल्या शोधप्रबंधात केले आहे. समाजातील वास्तव आणि वंचितांच्या संघर्षाला साहित्याच्या माध्यमातून त्यांनी वाचा फोडली आहे. प प्रस्तुत संशोधन कार्यासाठी अशोक मोरे यांना डॉ. बाळाजी नाटकरे तसेच आय.ए.एस. सी. चे संस्थापक डॉ. अशोक थोरात यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.१४ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## श्रीरामपूर येथे एटीएम फोडण्याचा प्रयत्न?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील मंगळवारी मध्यरात्री एटीएम फोडण्याचा प्रयत्न झाला मात्र येथून सुदैवाने एटीएममधील रक्कम नेण्यात चोरट्यांना यश आले नाही. त्यामुळं एटीएममधील रक्कम शाबूत राहिली आहेत.याबाबतची सविस्तर माहिती अशी की, श्रीरामपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रोडवर किशोर टॉकीजसमोर ॲक्सिस बँकेचे एटीएम आहे. सदरचे एटीएमची देखभाल मुकुंद राजपूत, (रा. म्हाडा कॉलनी, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर) यांच्याकडे आहेत. मंगळवारी सकाळी मुकुंद राजपूत यांच्या लक्षात आले असता एटीएम कोणीतरी फोडण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळे त्यांनी लगेच कंपनीचे अधिकारी भिमराव अंबादास बलखांडे यांना बोलावले. त्यानंतर एटीएमची पाहणी केली असता मध्यरात्री २.५० च्या सुमारास अज्ञात चोरटयांनी एटीएमची काच फोडून चोरी करण्याचा प्रयन केला.परंतू, एटीएम फोडण्यात चोरट्यांना यश न आल्याने चोरट्यांना माघारी फिरावे लागले.याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरूद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

# सिस्पेच्या एजंटांची गोठवलेली बँक खाते २१ दिवसात पूर्ववत करा

### जिल्हा सत्र न्यायालयाचे आदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : जास्त परताव्याच्या आमिषाने झालेली फसवणूक प्रकारणव राज्यभर गाजलेल्या (सिस्पे) प्रकरणात गोठवण्यात आलेल्या एजंटांच्या बँक खात्यांबाबत श्रीगोंदा येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालय श्रीगोंदा यांनी महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. न्यायालयाने अर्जदारांचे गोठवलेले बँक खाते २१ दिवसांच्या आत पूर्ववत सुरू करण्याचे निर्देश दिल्याने एजंटांना मोठा दिलासा मिळाला असून, गुंतवणूकदारांमध्ये मात्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखा आहिल्यानगर यांनी सिस्पे कंपनीच्या मुख्य सूत्रधारांसह सुमारे ८ हजार एजंटांची बँक खाती गोठवण्याची कारवाई केली होती.

तसेच तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सुमारे २७४ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्याची घोषणा केली होती. या तपासादरम्यान आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शरद गोर्डे यांनी दोन मुख्य आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून व्यापक तपास सुरू केला होता. मात्र, बँक खाती गोठवताना दंडाधिकाऱ्यांचा आदेश किंवा एमपीआयडी कायद्याच्या कलम ४ अंतर्गत राज्य शासनाचा आदेश सादर करण्यात आला नव्हता, हा महत्त्वाचा मुद्दा अर्जदारांचे वकील अनिकेत भोसले यांनी न्यायालयासमोर मांडला.या युक्तिवादानंतर अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश डी पी शिंगाडे यांनी संबंधित अर्जदारांची बँक खाती २१ दिवसांत पूर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले. सरकार पक्षाची बाजू सरकारी वकील पी के कापसे यांनी मांडली.

हा आदेश श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा क्रमांक ६७३/२०२५ संदर्भात असून, त्यामध्ये बीएनएस कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(२), ३१८(४), ३(५) तसेच एमपीआयडी कायद्याच्या कलम ३ अंतर्गत गुन्हे नोंद आहेत.या आदेशामुळे आता सिस्पे प्रकरणाच्या तपास प्रक्रियेवर आणि पुढील न्यायालयीन लढतीवर सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या मी सुट्टीवर असल्याने तपशीलवार माहिती नाही; मात्र ज्यांना कंपनीकडून एजंट लाभ झाला नाही, अशा अर्जदारांची खाती डी-फ्रीज करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत, अशी प्रतिक्रिया पोलीस निरीक्षक शरद गोरडे यांनी दिली.

# समृद्धी महामार्गावर बर्निंग कारचा थरार

### डॉ. संतोष मोकळ यांच्या सतर्कतेने चार प्रवाशांचे प्राण वाचले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : समृद्धी महामार्गावर धावत्या कारने अचानक पेट घेतल्याची थरारक घटना नुकतीच शिर्डी परिसरात घडली. प्रसंगावधान राखत डॉ. संतोष मोकळ यांनी तत्काळ कारमधील प्रवाशांना बाहेर काढून चार जणांचे प्राण वाचविल्याने संभाव्य अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, राहाता येथील प्रसिद्ध सर्जन डॉ. मोकळ हे आपल्या कुटुंबासह नागपूरहून शिर्डीकडे खासगी वाहनाने समृद्धी महामार्गावरून प्रवास करत होते.

सावळीविहीरजवळ शिर्डीकडे उतरणाऱ्या बाह्यवळण रस्त्याजवळ पोहोचत असताना त्यांच्या पुढे धावणाऱ्या एका कारच्या मागील भागातून धूर निघत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. काही क्षणांतच त्या वाहनाने पेट घेतला. स्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. मोकळ यांनी स्वतः चे वाहन पुढे घेत संबंधित कारचालकाला थांबण्याचा इशारा दिला. वाहन थांबताच त्यांनी तत्परतेने कारमधील प्रवाशांना बाहेर



उतरविले. काही क्षणांतच कारने अधिक भीषण स्वरूप धारण केल्याने मोठा अपघात टळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या कारमध्ये चार प्रवासी प्रवास करत होते. वेळेवर मदत मिळाल्याने सर्वजण सुखरूप बचावले. प्रवाशांनी डॉ. मोकळ यांचे आभार मानत त्यांच्या रूपाने देवदूतच मदतीला धावून आले, अशी भावना व्यक्त केली.

घटनेनंतर परिसरातील नागरिक व प्रवाशांकडून डॉ. मोकळ यांच्या धाडसाचे व तत्परतेचे कौतुक करण्यात येत आहे.

# बेलापूरात बोगस खरेदीखत नोंदवून फसवणूक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : व्यसनाचा गैरफायदा घेवून बोगस खरेदीखत नोंदवून घेतल्याने ते बेकायदेशीर आहेत. बोगस व बनावट खरेदीखत करून आपली फसवणुक केल्याची तक्रार तालुक्यातील बेलापूर येथील अभिजीत पंढरीनाथ शिंदे यांनी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात दिली. याबाबत शिंदे यांनी तक्रारीत सागितले की, आपण बेलापूर येथे पत्नी व दोन मुलासह राहत आहे.

मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करित असून मला दारूचे व्यसन आहेत. माझे नावे बेलापूर बु येथे गट नं. ४४/२/३१/९ दोन हे ०१ आर ही मिळकत असून, सदरचे मिळकत घेणेसाठी मला माझे होले मामा यांनी मदत केली होती. सदर मिळकतीवर ग्रामपंचायत घर क. ९३४/२७ यामध्ये दोन खोल्या, संडास, बाथरून आर. सी.सी. बांधकाम आहेत.

सदर एकमेव मिळकत मला व माझे कुटुंबीयास रहावयास आहे. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी मला प्रियंका प्रशांत गोर्डे (रा. म्हैसमळा, ममदापूर, ता. राहाता), नानासाहेब रखमाजी गाढे (रा. नगररोड, गाढे वस्ती, बेलापूर खुर्द, ता. श्रीरामपूर) व तुकाराम हौशिराम बनकर (रा.गावठाण, राजुरी, बाभळेश्वर, ता, राहाता, जि. अहिल्यानगर) यांनी दारू पाजुन शासकिय कार्यालयात नेवून माझे सही अगंठे घेतले. दारूच्या नशेत असल्यामुळे मी कोणत्या कागदावर सह्या केल्या यांची कल्पना मला नव्हती.

दरम्यान दि. २४ एप्रिल २०२६ रोजी कळाले की, माझे मिळकतीचे खरेदीखत हे प्रियंका प्रशांत गोर्डे हिने करून घेतलेले आहे व नानासाहेब रखमाजी गाढे व तुकाराम होशिराम बनकर त्यास साक्षीदार आहेत.या खरेदीखतास माझी संमती नव्हती. आरोपीनी मला खरेदीखतात नमुद केल्याप्रमाणे कोणताही भरणा दिलेला नाही. आरोपींनी माझ्या व्यसनाचा गैरफायदा घेवून बोगस खरेदीखत नोंदवून घेतले आहे ते बेकायदेशीर आहे, आरोपीनी बोगस, बनावट खरेदीखत करून माझी फसवणुक केली आहे.आरोपी यांनी एकत्रित होवून माझी मिळकत गिळकृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

आता आरोपी मला या मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करीत असून, त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांचेपासून मला व माझे कुटुंबीयाचे जिवीतास धोका निर्माण झाला आहे.आरोपीविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अभिजीत पंढरीनाथ शिदे केली.

# शॉर्टसर्किटने शेतातील साहीत्य जळुन खाक, नुकसान भरपाईची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : तालुक्यातील संजरपुर शिवारातील लक्ष्मीबाई रावसाहेब जगताप यांच्या गट नंबर २४ मध्ये असलेल्या विद्युत ट्रांसफार्मरच्या घर्षणाने शॉर्टसर्किट होऊन शेतात असलेल्या तुषार सिंचन, पिव्हीसी पाईप,अद्रकाचे पिक तसेच बाजरीचा चारा व ठिबक सिंचन,जळून खाक झाला असून तलाठी व तंत्रज्ञ यांनी संयुक्त पंचनामा करून महावितरणने नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.




गंगापूर तालुक्यातील संजरपुर शिवारातील लक्ष्मीबाई रावसाहेब जगताप यांच्या गट नंबर २४ मध्ये असलेल्या विद्युत ट्रांसफार्मरच्या घर्षणाने शॉर्टसर्किट होऊन शेतात असलेल्या तुषार सिंचन, पिव्हीसी पाईप, अद्रक पिकाचे तसेच बाजरीचा चारा व ठिबक सिंचन, जळून खाक झाला असून तलाठी व तंत्रज्ञ यांनी संयुक्त पंचनामा करून महावितरणने नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा नुकसान भरपाई मिळावी म्हणून न्यायालयात दाद मागणार असल्याची मागणी लक्ष्मीबाई जगताप यांनी केली आहे.

यावेळी योगेश पवार, योगेश काकडे, सचिन सोनवणे, सिताराम जगताप, तुळसीराम जगताप, रामेश्वर साळूंके, गणेश चौधरी, आप्पासाहेब शिंदे, अनिल कवडे, अमन शेख आदी उपस्थित होते.

# चितळीत तरूणाचा गळफास

### लग्नाला झाले १० दिवस, पत्नीकडून धमक्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : नवीन संसाराची स्वप्ने डोळ्यांत घेऊन लग्नबंधनात अडकलेल्या एका तरुणाने लग्नानंतर अवघ्या दहा दिवसांत आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना राहाता तालुक्यातील चितळी येथे घडली आहेत.पत्नी व तिच्या नातेवाईकांकडून मानसिक त्रास, धमक्या आणि फसवणूक झाल्याच्या आरोपांनंतर याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिसांनी पत्नीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मृत तरुणाचे नाव राहुल भाऊसाहेब खरात (वय २७, रा.चितळी ता.राहाता) असे असून, त्यांचा विवाह ३० एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथील एका युवतीसोबत झाला होता.लग्नानंतर काही दिवसांतच पत्नीचे दुसऱ्या युवकासोबत प्रेमसंबंध असल्याचे राहुल यांच्या निदर्शनास आले.

याबाबत विचारणा केली असता, पत्नीने गेल्या चार वर्षांपासून प्रेमसंबंध असल्याची कबुली दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहेत. या प्रकारामुळे दोन्ही कुटुंबांमध्ये वाद निर्माण झाला होता.दरम्यान, ९ मे रोजी पत्नी माहेरी निघून गेल्यानंतर तिने राहुल याला व्हॉट्सॲपवर स्वतःचे व प्रियकरासोबतचे व्हिडिओ आणि फोटो पाठवून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहेत.या मानसिक तणावामुळे राहुल प्रचंड दबावाखाली होता.याच विवंचनेतून राहुल यांनी ११ मे रोजी पहाटे राहत्या घरी लोखंडी अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे पोलिसांत दाखल फिर्यादीत म्हटले आहेत.दरम्यान, पत्नी माहेरी जात असताना सासरच्या घरातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचा नेकलेस, अंगठी, सोन्याचे मणी-मंगळसूत्र, झुबे असा अंदाजे ४१ ग्रॅम सोन्याचा ऐवज (अंदाजित किंमत ६ लाख १५ हजार रुपये) तसेच कपाटातील १७ हजार रुपयांची रोकड घेऊन गेल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला.या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात पूजा मुकुंद सकपाळ (पत्नी), मुकुंद हरिभाऊ सकपाळ (सासरा), बेबी मुकुंद सकपाळ (सासू), करण मुकुंद सकपाळ (साला) आणि आरती पारधे (मेहुणी) यांच्याविरुद्ध फसवणूक, चोरी आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तालुका पोलीस तपास सुरू आहे.




# ऐन उन्हाळ्यात उक्कलगावकरांना बसतोय, पाणीटंचाईच्या झळा !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगावकरांना ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहेत.गेल्या पंधरा दिवसांपासून वॉर्ड नं.१ व अन्य प्रभांगामध्ये पाणी टंचाईच्या झळा ग्रामस्थांना सोसाव्या लागत आहेत.विशेष म्हणजे उक्कलगावकरांना याआधी कधीही ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासली नव्हती.आज अखेरीच उन्हाच्या तडाख्यामुळे शरीराची लाही -लाही होत आहे.या प्रभागांमध्ये किमान १० मिनिटे पाणी आले तर, शुद्ध प्रतिचे पाणी ग्रामस्थांना मिळत नाहीत. त्यात पाच मिनिटेच गढूळ पिण्याचा पुरवठा सुरू होतो.असे ग्रामस्थांचे म्हणणे आहेत.मात्र सध्यातरी याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याचं गरजेचे आहेत.

यात भागातील १५ ते २० महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयात बुधवारी सकाळी प्रशासनास जाब विचारण्यासाठी दाखल झाल्या होत्या.यावेळी अनेक महिला कार्यालयात उपस्थित होत्या.गेल्या आठ ते दहा दिवसापासून प्रभाग एक भागात व अन्य प्रभागांमध्ये किमान १० मिनिटे पाणीपुरवठा केला जात आहेत.मात्र ग्रामस्थांना मुबलक पाणी मिळत नसल्याने तक्रार केली.महिलानी ग्रामपंचायत कार्यालयात जावून ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकाऱ्याना जाब विचारले, असता,त्यावेळी काही आक्रमक झाल्या.

यावेळी अधिकाऱ्यानी सागितलं की, पाणीपुरवठा तळ्याजवळ सायपन लिंक झाले. सध्या लिंक काढण्याचे काम प्रगतीपथावर आहेत. पाणीपुरवठा तळ्याजवळील भागात वीजपुरवठा ६ तास मिळत असल्याने पाण्याची टाकी भरण्यासाठी वेळेत भरत नसल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत.परंतु पाणीपुरवठा सुरळीत सुरू झाली नसल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहेत.

मे महिन्यातच उन्हाचा पारा वाढत असतानाच पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना पायपीट करावी लागत आहे.सध्या ग्रामस्थ वॉटर फिल्टर टाकीतून काही प्रमाणात आधार घ्यावा लागत आहेत.

**सरपंचानी फोन उचलला नाहीत.**

याबाबत सरपंच रविना शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता,त्यांनी फोन उचलला नाही.त्यामुळं त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाहीत.

नियोजनाच्या अभावामुळे गावाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहेत.मे महिना सुरू आहेत.अजून जून व जुलै महिना जायचा आहे.जर, गावात अशी परिस्थिती राहिली तर,पिण्याच्या पाण्याची गंभीर स्थिती होण्याची शक्यता आहेत.
**शरद नानासाहेब थोरात, विद्यमान ग्रामपंचायत, सदस्य**

जलजीवन मिशन अंतर्गत गावासाठी योजनेचे काम अपूरे असून, अद्याप योजना सुरू झालेली नाही.विशेष करून मुबलक पाणीसाठा असतानाच ग्रामस्थांना वणवण फिरावे लागतं, हे गावचं मोठं दुर्दैव.
**अनिल थोरात, विद्यमान ग्रामपंचायत, सदस्य**

# कल्पना खरातचा शोध लागेना!

### पोलीसांच्या तपासावर संशयाची नजर



अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : येथील जमीन अपहार व सावकारी च्या गुन्ह्यातील कॅप्टन खरात ची पत्नी तथा मुख्य आरोपी कल्पना खरात ही फरार असून शिर्डी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांना तिला पकडण्यात अपयश येत असल्याने पोलीसांच्या तपासावर संशयाची नजर फिरू लागली आहे . कॅप्टन खरात ला अटक झाल्या नंतर एसआयटी स्थापन झाली . खरात पोलीस कोठडीत माहिति लपवत असल्याने दि ३०मार्च रोजी खरात च्या बंगल्यावर पोलीसांनी धाड टाकली असता ती घरातून बेपता झाली होती .

दिड महिन्या पासून पोलीसांना ती सापडत नसल्याने पोलीसांच्या कामगिरी वर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे कल्पना खरात ही नामचीन गुन्हेगार नाही तशी तिला पार्श्वभूमी नाही . तिला पोलीस काही तासात हुडकून काढू शकतात हे तेवढेच सत्य आहे . पोलीस मोठ मोठ्या गुडांना जेरबंद करतात परंतू कल्पना त्यांना का सापडत नाही . कॅप्टन खरात चे येवढे मोठे कांड होवूनही सुरवातीला जो गाजावाजा झाला त्याचा असर हळूहळू कमी होत चालला असल्याचे दिसून येत आहे.

सर्वच तपास यंत्रणांना हा तपास कधी संपतो याचे वेध लागल्याने खरात प्रकरणापासून दूर होण्याचा प्रयत्न सध्या दिसून येत आहे. यामागे कारण ही तसेच आहे . खरात चे सर्वच क्षेत्रांतील उच्च पदस्थांशी असलेले संबंधामुळे तपास ढिला केला जातोय का हे ही या मागचे कारण असू शकते. कारण खरात चे जे उच्च पदस्थ पदाधिकारी लाभार्थी जे की आज ही त्या पदावर कार्यरत आहेत .

वरिष्ठांनाच जर कॅप्टन चा तपास नको असेल खालचे अधिकारी काय तपास करणार. ओष्णोजल प्राशन केलेले अनेक अधिकारी मंत्री प्रशासनात वरीष्ठ स्तरावर बसलेले आहेत.

खरातचा तपास खोलवर गेल्यास त्यांच्या खुर्चीला धोका उद्भवू शकतो त्यामुळे गुन्ह्याचा तपास आहे लवकर उरकून टाका कदाचीत असाही अघोषित आदेश असू शकतो. या प्रकरणात इडीची एन्ट्री झाली राहाता पतसंस्था व निलेश जपे यांचे मारी गोल्ड हॉटेल ची चौकशी झाली दस्तावेज तपासणी झाली त्यांच्या तपासात पुढे काय झाले, याचे गुढ कायम आहे. त्यामुळे सध्या तरी कॅप्टन खरात प्रकरणी शांतता असल्याचे दिसून येत आहे.

**रोहीत पवार यांच्या आरोपांना पुष्टी**

मोठे नेते, अधिकारी आणि व्यावसायिक अडकल्याने नावे वगळण्यासाठी आर्थिक रॅकेट सुरु आहे. रॅकेटमधून आपलं नाव निघावं यासाठी एक ट्रिक वापरली जात आहे . या प्रकरणातील १ टक्के सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत. यामध्ये अनेक मोठे मासे देखील आहेत. या प्रकरणाच्या तपासातून सुटका करून घेण्यासाठी किंवा नाव बाजूला काढण्यासाठी मोठमोठ्या रकमा घेऊन अनेकांना यातून अलगद बाहेर काढले जात असल्याचा दावा आ.रोहीत पवार यांनी केला होता त्यास पुष्टी मिळत आहे. अहिल्या नगर चे नव्यानेच पदभार घेतलेले पोलीस अधिक्षक ममुक्का सुदर्शन हे तिच्या अटकेसाठी काय उपाययोजना करतात यावर अहिल्या नगर पोलीसांची प्रतिमा ठरणार आहे.

**अटकपूर्व जामीन फेटाळला**

उच्च न्यायालयात कल्पना खरात हीचा अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी मा न्यायमूर्ती यांनी घेतली नाही. ती सुनावणी ३ आठवडे पुढे ढकलली आहे..जून च्या १ ल्या आठवड्यात सुनावनी होण्याची शक्यता आहे .त्यामुळे पोलिसांना कल्पना ला अटक करण्याची संधी चालून आली आहे . आता पोलीस तिला अटक करतात की नाही यावर पुढील तपासाची दिशा ठरणार आहे.